ज्ञानाची राजनीती पुस्तकमाला–5

# लोकविद्या

(मराठी अनुवाद)



विद्या आश्रम
सारनाथ, वाराणसी–221007

9. इंटरनेट एका वेगळयाच प्रकारचा समाज घडवण्याचे नव्हे तर केवळ संपर्क व संचाराचे माध्यम मानून मायावी (Virtual) जगाच्या सीमा ओळखणे आणि त्या उघड करणे.
10. लोकविद्येला ज्ञान म्हणून प्रतिष्ठा देणे.
11. लोकविद्येला सामाजिक प्रतिष्ठा मिळावी यासाठी कार्य करणे.
12. लोकविद्यावंत समाजांना आदरयुक्त सन्मानाची वागवणूक देणे.
13. लोकविद्येला शिक्षणात समाविष्ट करण्यासाठी उपाय योजना करणे.
14. केवळ मनोरंजनाचे साधन म्हणून कलेकडे बघण्याच्या वृत्तीला विरोध करणे.
15. ज्ञानाचे शोषण करणाऱ्या व्यवस्थांचा पडदाफाश करणे आणि या शोषणाला विरोध करणाऱ्या लढ्यांत सामिल होणे.
16. व्यापार आणि बाजारपेठे च्या माध्यमांतून होणाऱ्या शेतकरी व कारागिरांच्या शोषणाला विरोध करणे.
17. लोकविद्यावंत समाजाला आपले ज्ञान कोणत्याही आडकाठी शिवाय मुक्त पणे वापरता यावे या संकल्पनेचा पुरस्कार करणे.

विद्या आश्रम, सा10/82 ए, अशोक मार्ग, सारनाथ,
वाराणसी – 221007, फोन : 0542–2595120



ज्ञानाची राजनीती पुस्तकमाला–5

# लोकविद्या

(मराठी अनुवाद)

विद्या आश्रम
सारनाथ, वाराणसी–221007

ज्ञानाची राजनीती पुस्तकमाला-5

सामान्य संपादक : डॉ. चित्रा सहस्रबुध्दे

पुस्तक : लोकविद्या

वर्ष : नोव्हेंबर, 2008

मराठी अनुवाद : गौरी देशपांडे
नीलिमा सहस्रबुध्दे

मराठी अनुवाद : जून, 2014

मूळ प्रकाशन आणि लेखन : डॉ. चित्रा सहस्रबुध्दे
विद्या आश्रम, सारनाथ, वाराणसी च्या वतीने

अक्षर संयोजन : मुकेश बोरीकर

मुद्रक : सत्तनाम प्रिंटर्स, एस–1/208 के–1, नईबस्ती,
पाण्डेयपुर, वाराणसी–221002

सहयोग राशी : रु. 10/–

संपर्क : लोकविद्या जन आन्दोलन
डी 1, वृत्त सृष्टि संकुल, पूर्व हायकोर्ट मार्ग,
धरमपेठ,नागपूर–440010.
फोन : 09422559348 (गिरीश)
09890336873 (विलास)
फोन : 020–27298293 (सुरेन्द्रन्, पुणे)
वेब साईट : http://vidyaashram.org
ब्लॉग : http://lokavidyajanandolan.blogspot.in



**परिशिष्ट-5**

# बौध्दिक सत्याग्रह

ज्ञान मनुष्य प्राण्याचा स्वभाव आहे. ज्ञानामुळेच मनुष्यगुणांना प्रतिष्ठा लाभते. ज्ञान जेव्हा निहित स्वार्थाच्या आहारी जाते किंवा ज्ञान–व्यवस्थापकांच्या हातातले कळसुत्री बाहुले बनून राहते, तेव्हा ज्ञानाच्या शोषणाचा मार्ग मोकळा होतो, सामाजिक नीतीमूल्यांचा ऱ्हास होतो. विस्तृत समाजात हलाखी माजते आणि समाज दोन भागात वाटला जातो. एकीकडे ज्ञानावर अधिकार गाजवणाऱ्या भांडवलाचे जग असते, तर दुसरीकडे जवळ–जवळ सर्वच लोक. ज्ञान मुक्तीतच मानव मुक्तीचा मार्ग आहे. हेच एकविसाव्या शतकाचे आव्हान आहे. बौध्दिक सत्याग्रह म्हणजे हे आव्हान पेलण्याची सुरवात होय!

ज्ञान या संकल्पने विषयी एक व्यापक दृष्टिकोन अंगिकारणे आणि तो व्यवहारात उतरवणे, याचा एक उपाय म्हणजे बौध्दिक सत्याग्रह. वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवर याचे आकलन व्हायला निम्नलिखित गोष्टी उपयोगी ठराव्यात.

1. ज्ञानाच्या क्षेत्रात उच्च–नीच, श्रेष्ठ–कनिष्ठ असा भेद नाकारणे.
2. ज्ञानाचा कुठलाही एक प्रकार सर्वश्रेष्ठ न मानणे.
3. ज्ञानाचा कुठल्याही एक स्थळाला अन्य सर्वांपेक्षा जास्त महत्व न देणे.
4. ज्ञान निर्मितीची कुठलीही पध्दत कुठल्याही संदर्भ किंवा परिस्थितीत अन्य सर्वांपेक्षा अधिक योग्यच असते असे न मानणे.
5. ज्ञानाच्या खाजगीकरणाला विरोध करणे.
6. ज्ञान संग्रहाचे वेगवेगळे मार्ग स्वीकारणे.
7. कम्प्यूटर माहिती–संग्रहाचे एक तंत्र असून त्याला 'मानवाचीच एक कृती' याहून वरचा दर्जा न देणे.
8. ज्ञान–व्यवस्थापनात कम्प्यूटरला कुठल्याही एका यंत्रापेक्षा वर न मानणे.

## लोकविद्या सत्संग म्हणजे काय?

लोकविद्या सत्संग लोकविद्येला प्रतिष्ठा मिळवायची मोहिम आहे.
लोकविद्या सत्संग मध्ये सामिल व्हा आणि तीन गोष्टी करा.

- माहिती युगात श्रम आणि ज्ञानाची लूट रोखण्याचे मार्ग शोधा.
- ही लूट थांबविण्याकरिता आपसात चर्चा व चिंतन करा.
- बाजारपेठा आणि ज्ञानाच्या क्षेत्रात होत असलेल्या शोषणाचे आकलन व त्या विरूध्द लढ्याला ठोस आकार द्या.

**ज्ञानी कोण? ज्ञान कशात? कोठे? छडा याचा लावायचा आहे!**
**घरोघरी, खेडोपाडी ज्ञानी जनात राळ हीच उठवायची आहे!!**

कमी शिक्षण घेतलेला माणूस अज्ञानी असतो असे समजू नका. तो लोकविद्येचा ज्ञानी असतो. लोकविद्या सत्संगमध्ये आपले स्वागत आहे. या सत्संगात आपण आपले विचार घेऊन सहभागी व्हा.



# लोकविद्या

**अध्याय** **पृष्ठ संख्या**


| अध्याय | | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| 1. | गरीबी कृत्रिम आहे ? | 1 |
| 2. | ज्याची विद्या त्याची शक्ती | 10 |
| 3. | लोकविद्या म्हणजे काय ? | 16 |
| 4. | लोकविद्याकरण | 25 |
| 5. | लोकविद्येची सामाजिक शक्ती | 30 |
| 6. | लोकविद्येची आर्थिक ताकद | 36 |
| 7. | दर्शन | 47 |
| 8. | ज्ञानाची राजनीती | 58 |
| **परिशिष्ट** | | |
| 1. | लोकविद्या पंचायत | 64 |
| 2. | भाईचारा विद्यालय | 67 |
| 3. | ज्ञान मुक्ती मंच | 69 |
| 4. | लोकविद्या सत्संग | 71 |
| 5. | बौध्दिक सत्याग्रह | 73 |

## ज्ञानाची राजनीती पुस्तकमाला

1990 पासून जगात परिवर्तनाचे एक नवीन पर्व सुरू झाले. माहिती उद्योगाचा विकास, खाजगीकरण, जागतिक बाजारपेठा, संचार माध्यमे, मनोरंजन आणि अमेरिकेची अरेरावी या परिवर्तनाच्या महत्वाच्या बाजू आहेत. या बाजू नीट समजून घेऊनच या परिवर्तनाचे आकलन होऊ शकते.

माहिती उद्योगाने ज्ञानाची नवीन व्याख्या केली. असे म्हणायला हरकत नसावी की या जोरावरच ज्ञान-समाज बनत आहे. विज्ञानाच्या सार्वभौमत्वाचा अस्त होत आहे. इंटरनेटचे वर्चस्व वाढले आहे. परिणामी लोकविद्येला पुन्हा चेहरा सापडला आहे.

मात्र शेतकरी, कारागीर, स्त्रिया, आदिवासी, लहान व्यावसायिक आणि मध्यम वर्गासाठी ज्ञान आणि विकासाच्या गोष्टी भूलथापा ठरत आहेत. या सर्वांकडे विस्तृत ज्ञान आहे, पण या ज्ञानावर कप्यूटर-इंटरनेटच्या माध्यमाने वर्चस्व गाजवले जात आहे. तर दुसरीकडे यांच्या उत्पादनाला बाजारपेठेत पुरेसे दाम नाहीत. परिणामी गरीब परंतु ज्ञानी अशा या समाजांचे शोषण नवीन व्यवस्थेने मांडले आहे. लोकविद्या, विज्ञान आणि इंटरनेटवर नवीन भांडवलदार व वित्त भांडवलाच्या मालकांचा कब्जा आहे.

सर्वच राजकीय पक्ष विकासाचे पूजक आहेत. यात गरीबी दूर करण्याचे मार्ग तर नाहीच नाहीत, उलट हा विकास गरीबांच्या शोषणावरच आधारलेला आहे. गरीबांचे हित सर्वोपरी मानेल अशा परिवर्तनाच्या राजकारणाची आज खरी गरज आहे. परिवर्तनाचे एक नवीन राजकारण जेव्हा उभे होईल तेव्हाच ही गरज भागेल. हे राजकारणच ज्ञानाचे राजकारण आहे.

ज्ञानाच्या राजकारणाचा नवा विचार सर्वांसमक्ष यावा आणि त्यावर सार्वत्रिक चर्चा घडावी यासाठी पाच पुस्तकांची ही पुस्तक.माला तयार केली आहे. ही पुस्तके आहेतः

1) बौध्दिक सत्याग्रह
2) लोकहिताचे राजकारण आणि ज्ञानाचा प्रश्न
3) ज्ञान-मुक्ती आवाहन
4) युवा ज्ञान शिबिर
5) लोकविद्या

प्रस्तुत पुस्तक यांपैकी पाचव्या पुस्तकाचा मराठी अनुवाद आहे उरलेल्या चार पुस्तकांचे अनुवाद यथावकाश उपलब्ध होतील, असा आमचा प्रयत्न आहे.



**परिशिष्ट-4**

# लोकविद्या सत्संग

विद्या आश्रम, सा 10/12 ए, अशोक मार्ग, सारनाथ,
वाराणसी – 221007 फोन : 0542-2595120

**पाखंड आणि असमानते विरूध्द राळ उठवणे हा लोकविद्या सत्संग चा कार्यकम आहे.**

गंगेच्या काठी दर महिन्याच्या ३० तारखेला सायंकाळी 5.00 वा.
लोकविद्या सत्संग भरतो.

**सर्व शेतकरी, कारागीर, लहान व्यावसायिक आणि मजुरांनो, एक व्हा!**

**कारण**

माहिती युगात कम्प्यूटर-इंटरनेट व जागतिकीकरण मिळून शेती, कारागिरी आणि लहान व्यवसाय यांना नष्ट करत आहेत, मजुरी घटवत आहेत.

**कसे ?**

- यांच्या श्रमाला कमी किंमत देऊन.
- यांच्या ज्ञानाची, म्हणजेच लोकविद्येची, लूट मांडून.
- शिक्षण महागडे बनवून यांना नवीन ज्ञानापासून वंचित करून.

म्हणायला तर हे ज्ञान आधारित माहिती युग आहे. पण वास्तवात मात्र हे ज्ञानावर कब्जा आणि ज्ञानाच्या शोषणाचेच युग आहे. किंबहुना, सर्वसामान्य लोकांचे जगणे जगणे व्हावे, समाजात न्याय असावा व सर्व युवकांना प्रगतीचा वाव मिळावा याकरिता ज्ञानावरती भांडवलशहांची पकड सुटावी आणि ज्ञानाची शोषणापासून मुक्ती व्हावी हे गरजेचे आहे. ज्ञान–मुक्ती मंचाची निर्मिती या उद्देशाने केली आहे. मंचाच्या प्रमुख मागण्या अशा आहेत.

- कम्प्यूटर हिंदी आणि अन्य प्रादेशिक भाषांत असावा.
- मीडिया–शाळा प्रत्येक गावात असावी.
- शेतमालाला उचित भाव मिळावा.
- घरोघरी उद्योग असावेत.
- स्थानिक बाजारपेठ संरक्षित असावी.
- शिक्षणात लोकविद्येचा समावेश असावा.
- उच्च शिक्षणाची कवाडे सर्वांसाठी खुली असावीत.

जागोजागी युवा-शिबिरे भरवून नवीन विचार रूजवण्याचे कार्य ज्ञान-मुक्ति मंच करत आहे. या शिबिरांत भाग घेण्यासाठी पुढे या!

संचालन समिती, ज्ञान मुक्ति मंच
विद्या आश्रम, अशोक मार्ग, सारनाथ, वाराणसी
फोन : 0542-2595120



# विषय प्रवेश

औद्योगिक क्रान्ती पासून मानवाच्या वैचारिक आणि व्यावहारिक उपक्रमांचे केन्द्र ‘उत्पादन’ ठरले. उत्पादनांची साधने, मालकी, त्यांचे नियंत्रण व्यवस्थापन, केन्द्रीकृत आणि विकेंद्रित उत्पादन इत्यादी गोष्टी चर्चेचे विषय झाल्या. एकीकडे भांडवलशाही शक्तींनी हे विषय स्वहिताच्या बाजूने प्रशस्त केले. दुसरीकडे याच मुद्यांच्या अनुषंगाने लोकहितांचे राजकारणही मजबूत झाले. माहिती युगात हेच मध्यवर्ती महत्त्व ज्ञान या संकल्पनेचे आहे. म्हणूनच या संकल्पनेचे वेग वेगवेगळे आयाम उघड केल्याशिवाय आजच्या जगात लोकहिताच्या परिणामकारक परिवर्तन घडवू शकेल अशा राजकारणाचे मार्ग गवसत नाहीत. ‘ज्ञान’ या शब्दाचा आज सार्वत्रिक वापर होत आहे, ज्ञान–समाज, ज्ञान–श्रम, ज्ञान–कार्य, ज्ञान–व्यवस्थापन, ज्ञान–उत्पादन, ज्ञान–अर्थकारण, ज्ञान–केंद्र, ज्ञान–सहकार्य इ. ज्ञान–उपक्रमांचे एक नवीनच स्थान आता अस्तित्वात आहे ज्याला इंटरनेट असे म्हणतात. किंबहुना ‘ज्ञान’ हा परवलीचा शब्द झाला आहे.

माहिती–युगातील या बदलांवर जे बारीक नजर ठेवू इच्छितात आणि लोकहित जपण्यासाठी हे बदल नीट समजून घेवू इच्छितात अशा सामाजिक कार्यकर्त्यांसाठीच ही पुस्तिका लिहिली आहे. तळागाळातल्यांचे राजकारण उभारण्याचा विचार घडवण्यात या पुस्तिकेने हातभार लाभावा, एवढीच इच्छा बाळगून हा प्रपंच केला आहे.

**परिशिष्ट-**3

# ज्ञान मुक्ती मंच

**एकविसाव्या शतकासोबतच उद्योग–युग संपुष्टात येऊन माहिती युगाची सुरवात झाली. असे म्हणतात की एक ज्ञान–प्रधान समाज अस्तित्वात येत आहे. टी. व्ही, कम्प्यूटर, मोबाईल, इंटरनेट यांसारख्या माहिती उद्योगांची भरभराट होत आहे. लहान उद्योग आणि शेती मोडकळीला आले आहेत आणि यांवर विसंबून असलेले लोक आत्महत्येचा मार्ग स्वीकारत आहेत. जे तरूण इंग्रजी भाषेत कम्प्यूटर वर कुशलतेने काम करू शकतात तेच लठ्ठ पगारांचे धनी आहेत. इतरांसाठी मात्र सन्मानाचे रोजगार मिळायचे मार्गच बंद होत चालले आहेत.**

- ज्ञान–प्रधान माहिती युगात शिक्षण महागडे झाले आहे. म्हणजेच सर्वसामान्य लोक शिक्षणाच्या अधिकाराला मुकत चालले आहेत.
- ज्ञान–प्रधान माहिती युगात ज्ञानाच्या सगळया क्रिया कम्प्यूटर–इंटरनेट वर इंग्रजी भाषेत होतात. म्हणजेच कम्प्यूटरचे ज्ञान सामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहे.
- ज्ञान–प्रधान माहिती युगात लोकविद्येला (शेती, कारागीरी, वनोद्योग, आरोग्य–रक्षण, पालन–पोषण सारखे लोक–आधारीत ज्ञान) किंमत नाही. म्हणजेच, सामान्यांच्या ज्ञानाचे शोषण होत आहे.
- ज्ञान–प्रधान माहिती युगात लोकविद्येचे पेटंट होऊन कम्प्यूटर वर तिचा संग्रह सुरू आहे. म्हणजेच लोकविद्येवर भांडवली प्रभुत्व लादले जात आहे.
- ज्ञान–प्रधान माहिती युगात शिक्षण, बाजारपेठ, प्रशासन आणि सेवा (पोस्ट, बॅंक, पुस्तकालये, बातम्या, संशोधन, माहिती इ.) यांचे कम्प्यूटर वर स्थानांतरण होत आहे. म्हणजेच सार्वजनिक व्यवस्था गरिबांपासून दूर होत आहेत.

## भाईचारा विद्यालय मोहिमेची उद्दिष्टे

- बौध्दिक सत्याग्रहाचा पाया घालणे.
- गरीब मुलांत प्राथमिक शिक्षणा मार्फत आत्मविश्वास रूजवणे.
- सामान्यजन, शेतकरी, कारागीर, आदिवासी, लहान व्यावसायिक आणि त्यांच्या कुटुंबांच्या ज्ञानाचे बळ ओळखून त्या ज्ञानाला सार्वजनिक प्रतिष्ठा देण्यासाठी कार्य करणे, याकरिता लोकविद्यावंतांसोबत ज्ञान–संवाद आणि विविध सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रम हाती घेणे.
- या मोहिमेतील कार्यकर्त्यांत वेगवेगळया प्रकारच्या ज्ञानाचे मूल्यांकन करण्याच्या क्षमतांचा विकास व्हावा या उद्देशाने युवा ज्ञान–शिबिरांचे आयोजन करणे.

## ज्ञानाची वचने

- ज्ञान म्हणजे उद्योग नव्हे.
- ज्ञान उपजीविकेचे साधन आहे, नफेखोरीचे नव्हे.
- ज्ञान समाजहिताचे वाहन आहे, शोषणाचे साधन नव्हे.
- ज्ञानाचे सर्व प्रवाह समान प्रतिष्ठा व सन्मानाचे अधिकारी आहेत.
- ज्ञान मानव आणि समाज यांच्या मुक्तीचा स्त्रोत आहे.

विद्या आश्रम असे स्थान आहे की जिथे ज्यांच्या जाणिवा समाजातील गरीब व शोषितांशी जुळलेल्या आहेत असे समाजातील विचारक, लोकविद्याधर, सामाजिक कार्यकर्ते, वैज्ञानिक आणि तत्वज्ञ एकत्र येतात. समाजाच्या ताकदीचा (लोकशक्तीचा) आधार लोकविद्येची लूट व शोषणा चा विरोध करणाऱ्या रचनात्मक कार्यात आणि संघर्षात आहे, अशी विद्या आश्रमची मान्यता आहे.



# १ गरीबी कृत्रिम आहे ?

सेवाग्रामला आश्रमा़ जवळच्या एका झाडाखाली एका चर्चेचे आयोजन केले आहे. विषय आहे शिक्षण, तांत्रिक विकास आणि देशाची प्रगती. सामाजिक, राजनीतिक कार्यकर्ते जमलेले आहेत. बाहेरून देखिल बरेच लोक आले आहेत. चर्चा अगदी रंगात आली आहे.... सभा संपते. लोक हळूहळू बाहेर पडतात. बाहेर जातानाही त्यांच्यात चर्चा चालूच आहे. कोणी सायकलने, कोणी स्कूटरने करता करता हळूहळू दोघांना सोडून सगळे लोक गेले. परंतु त्यांच्यातील चर्चा मात्र संपायचे नाव घेत नव्हती. त्यांचातील एक 28–29 वर्षाचा तरूण आहे तर दुसरा 40–45 चा मध्यमवयीन गृहस्थ! सायकल पकडून हात दुखायला लागले तर त्या उभ्या करून हे दोघे एका कोपऱ्यात जाऊन बसले आणि पुन्हा जोराने प्रश्नोत्तरांना सुरूवात झाली. त्या तरुणाला फारच प्रश्न पडत होते. प्रौढ मात्र धीर गंभीरपणे त्याला उत्तरे देत होता.

**प्रश्न :** स्वातंत्र्यानंतर आपल्या देशाने इतकी प्रगती केली! आज अख्ख्या जगात आपले कम्प्यूटर इंजिनियर आणि वैज्ञानिक यांची चलती आहे. ही मोठी गोष्ट नाही का?

**उत्तर :** हे खरे आहे की जगात सगळीकडे आपल्याला असे दिसते की कम्प्यूटर इंजिनियर आणि वैज्ञानिक यांच्यात बरेच भारतीय आहेत. परंतु यामुळे देश प्रगती करतो आहे, हे कसे सिध्द होते? या बोटावर मोजण्याइतक्या लोकांच्या प्रगतीने पूर्ण देशाची प्रगती होते आहे, असे कसे म्हणता येईल? देश प्रगतीपथावर आहे की नाही, हे याच्यावरून ठरवले गेले पाहिजे की येथे गरिबांना किती रोजगार मिळतो, किती गरिबांसाठी रोजगाराची संधी उपलब्ध आहे, त्यांना पौष्टिक जेवण मिळते का, त्यांना शिक्षण व आरोग्य पुरवण्यासाठी योग्य ती व्यवस्था आहे का, गरिबांची स्वतंत्र व्यवसाय सुरू करण्याची, पुढाकार घेण्याची तयारी आहे का, लोकांमध्ये परस्परांतील प्रेम, विश्वास जागृत आहे का, नैतिकतेसाठी किती लोक आग्रही आहेत.

**प्रश्न :** गरीब, श्रीमंत हा भेदभाव तर आपल्याकडे पुरातन काळापासून चालत आला आहे. परंतु तरीसुध्दा या देशातील काही लोक आज युरोप–अमेरिकेतील लोकांच्या तोडीचे काम करीत आहेत, ही आपल्यासाठी अभिमानाची गोष्ट नाही का?

**उत्तर :** पण तुम्ही हा विचार का करता की युरोप–अमेरिकेतील लोक आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहेत आणि आपण ही त्यांच्यासारखे होऊ तेव्हाच आपली प्रगती होईल? खरे तर असे मानण्यातच खरी गडबड आहे. असे पाहा की आज या देशांकडे जी संपत्ती आहे, ती ते आमच्या सारख्यांकडून लुटून घेऊन गेले आहेत आणि याच संपत्तीच्या जीवावर त्यांनी आपल्या लोकांशी, आमच्या देशाशी, निसर्गाशी मनमाना व्यवहार केला आहे. परिणामतः आज जगात सगळीकडे पर्यावरणाचे भीषण संकट आ वासून उभे आहे. सगळया गरीब देशांना वेठीला धरून हे लोक त्यांना धमकावत राहातात! या सगळ्यावर वरताण म्हणजे अमेरिकेने सगळे कायदे नियम धाब्यावर बसवून चक्क इराक, अफगाणिस्तान यांच्यावर आक्रमण केले! आणि काही युरोपीय देश अमेरिकेच्या मदतीसाठी आपली सेना पाठवतात! अरे हे काय आहे? आणि अशांशी आपण बरोबरी करू पाहातो? कुठे आहे आपला स्वाभिमान? दुसरा मुद्दा असा की गरीबी ही नेहमीच होती आणि पुढेही राहील ही खोटी गोष्ट आहे. आपल्या समाज व्यवस्थेतील त्रुटीच गरीबीच्या उद्भवासाठी कारणीभूत आहेत. तेव्हा या त्रुटींना बाजूला करुन किंवा नव्या प्रथा प्रचलित करुन कदाचित आपण गरीबीवर मात करु शकू ! असे पहा की लोकांच्या मिळकतीमध्ये थोडा बहुत फरक तर राहणारच. परंतु जास्त मिळकत असलेले आणि कमी मिळकत असलेले, त्यांच्यातील तफावत वाढत जाते, तेव्हाच गरीबीचा उगम होतो. जास्त मिळकत असणारे कमीच असतात परंतु ते पैशाच्या जोरावर सगळ्यांना भारी पडतात. त्यांना जे हवं ते पैशाने विकत घेतात. परिणामतः गरीबी वाढत जाते.

**प्रश्न :** असे अजिबात नाही. लोक शिकत नाहीत, कामचोरी करतात, त्यांची



**परिशिष्ट-**2

# भाईचारा विद्यालय

विद्या आश्रम, अशोक मार्ग, वाराणसी – 221007

फोन : 0542-2595120

**भाईचारा विद्यालय लोकविद्येला प्रतिष्ठा मिळवायची मोहीम होय.**

## नीतीमूल्ये

- लोकहित साधेल तेच ज्ञान
- असमानता दूर करेल तेच शिक्षण
- मानाची भाकरी देतील तेच श्रम

## मूळ मांडणी

- लोकविद्या हे जगातले ज्ञानाचे सर्वात मोठे भांडार आहे.
- विद्यापीठांच्या बाहेर लोकांपाशी जे ज्ञान आहे ते म्हणजे लोकविद्या.
- शेतकरी, आदिवासी, कारागीर, लहान व्यावसायिक आणि महिला लोकविद्यावंत आहेत.
- लोकविद्येला ज्ञानाचा दर्जा नसणे यातच असमानतेचा स्त्रोत आहे.
- समाजात सर्वच ज्ञान–प्रवाहांना समान प्रतिष्ठा असावी.
- आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक सर्वच क्षेत्रांत लोकविद्येला विद्यापीठांतील ज्ञाना बरोबरीचा दर्जा असावा.
- माहिती युगात एक ज्ञान–समाज घडत आहे.
- या युगात लोकविद्येचे शोषण चरम सीमेवर पोचले आहे.
- भांडवलदारांच्या संस्था लोकविद्येवर प्रभुत्व गाजवत आहेत.
- या जोखडातून, या शोषणातून लोकविद्येची मुक्ती हीच आमची मोहीम आहे.

3. संचार माध्यमे आणि सांस्कृतिक क्षेत्रांत लोकविद्येची नीतीमूल्ये, ताकद व स्थान कुठल्याप्रकारे रूजवता व मजबूत करता येतील यावर चिंतन होऊन तशी पावले उचलली जावीत यासाठी पुढाकार घेतला जाईल.
4. लोकविद्या व लोकविद्याधर समाज यांची भरभराट, सन्मान आणि समृध्दी साधण्याच्या उद्देशाने राजकीय आणि सामाजिक नेतृत्वासमक्ष सतत विचार व प्रस्ताव मांडले जातील.

या!

लोकविद्या पंचायत मध्ये सहभागी होऊन लोकविद्या ज्ञान आहे आणि लोकविद्याधर ज्ञानी आहेत असा दावा करु,

आणि,

समता व न्यायावर आधारलेला समाज घडवण्यासाठी लोक–आधारित ज्ञानक्रिया समाजात रूजवू.

विद्या आश्रम असे स्थान आहे की जिथे ज्यांच्या जाणिवा समाजातील गरीब व शोषितांशी जुळलेल्या आहेत असे समाजातील विचारक, लोकविद्याधर, सामाजिक कार्यकर्ते, वैज्ञानिक आणि तत्वज्ञ एकत्र येतात. समाजाच्या ताकदीचा (लोकशक्तीचा) आधार लोकविद्येची लूट व शोषणा चा विरोध करणाऱ्या रचनात्मक कार्यात आणि संघर्षात आहे, अशी विद्या आश्रमची मान्यता आहे.



मेहनत करायची तयारी नाही, रूढी परंपरा यातून बाहेर पडण्याची तयारी नाही मग ते गरीब राहणार नाही तर काय?

**उत्तर :** अरे हे काय बोलताय तुम्ही? तुम्ही तर गरीबांवर एकामागून एक आरोप करीत चाललात. अहो, कुणी जाणूनबुजून आपल्याच पायांवर कुऱ्हाड मारेल का? तुम्हाला काय वाटते शेतकरी कशासाठी आत्महत्या करताहेत? पेरलेल्या बियाणांना जेव्हा कोंबच येत नाहीत, शेतीची वाट लागते तर यामुळे तो कामचुकार कसा होतो? धान्याला उत्पादनापेक्षा ही कमी विक्री मूल्य सतत मिळाले, तर तो कामचोर कसा होतो? विणकरांचीही तीच कथा आहे. असे म्हणा की सगळ्या कारागीरांचे आज असे हाल आहेत की दिवसाला 12/12 तास काम करूनही महिन्याला जेमतेम 3000 रु. मोठ्या मुश्किलीने मिळतात. साऱ्या देशात आज हेच चित्र आहे. शेतकरी किंवा कारागीरच कशाला, छोट्या छोट्या दुकानदारांचीही हीच परिस्थिती आहे. वास्तविक आज तेच गरीब आहेत जे शेतकरी, कामकरी, कारागीर, आदिवासी आहेत आणि यांची एकत्रित संख्या आपल्या लोकसंख्येच्या 80 टक्के आहे. हे सगळेच्या सगळे तर नक्कीच कामचुकार नाहीत. त्यांना गरीबीत जीवन कंठण्याचा शौकही नाही आणि त्यांना रूढीवादी, बुरसटलेली म्हणणं तर सरळ सरळ चूक आहे कारण दुसऱ्या कोणत्या मार्गानी जायला त्यांच्यासमोर मार्गच कुठे आहे?

**प्रश्न :** तर मग तुम्हीच सांगा की हे लोक गरीब का आहेत?

**उत्तर :** या प्रश्नाचं उत्तर इतके सरळ सोपे नाही परंतु ठोकळ मानाने काही कारणे मांडली जाऊ शकतात. सर्वप्रथम हे लक्षात घ्या की गरीबी कृत्रिमरीत्या थोपली जाते. इंग्रजांनी लादलेल्या गुलामगिरीतून ती वहिवाटीने तुमच्याकडे आली आहे. आपल्याच देशात नाही तर साऱ्या जगातच 19–20 व्या शतकांत गरीबीमध्ये अचानक वाढ झाली आहे, आणि ही औद्योगिक युगाची देण आहे. युरोपातील काही देशांनी मशीनींच्या सहाय्याने प्रचंड उत्पादन करून आणि वसाहतवादाचे राजकारण खेळून निसर्गाचे आणि मानवी श्रमांचे अंदाधुंद शोषण सुरू केले. वसाहतवादामुळे समाज

आणि निसर्ग दोघेही गरीब होत गेले. बघायला गेले तर जगात आज सगळे देश स्वतंत्र आहेत परंतु त्यांच्या आर्थिक, राजनैतिक डोलाऱ्यामधे काही फारसा बदल झाला नाही. यामुळे निसर्ग, मनुष्य समाज यांचे फार नुकसान झाले आहे. अर्थात स्वातंत्र्यानंतर काही काळ देशातील जनतेसाठी सुखाचं, समाधानाचं वातावरण होतं. ह्या काळात समाजातील बऱ्याच लोकांपर्यंत संपन्नता पोचली. मोठे मोठे उद्योग, दवाखाने, विद्यापीठे, धरणे अशा मोठ्या मोठ्या योजना सुरू होण्याचा हा काळ होता. म्हणजेच सगळे काही तसेच होत होते की ज्याला युरोपातील ज्ञानी जनांत मान्यता होती. त्यांच्या विज्ञानामुळे मानवी श्रम आणि नैसर्गिक शोषणात भर पडली आणि बघता बघता शहरी क्षेत्रांमध्ये ही आधुनिकतेची चमक पोचली. परंतु या सगळ्याची किंमत कोणी चुकवली? आमचे शेतकरी, कामकरी, कारागीर, छोटे दुकानदार ह्यांना आणखी गरीबी आली.

**प्रश्न :** ती कशी?

**उत्तर :** मोठ मोठ्या गिरण्या कारखान्यांना लागणारा कच्चा माल स्वस्तात विकण्यासाठी आमच्या शेतकऱ्यास भाग पाडले गेले त्यामुळे कारागीरांना कच्चा माल स्वस्तात मिळेनासा झाला. त्यामुळे त्यांनी उत्पादित केलेल्या मालाची किंमत वाढली आणि कारखान्या मधून निर्माण झालेल्या स्वस्त वस्तूंनी बाजार भरून वाहू लागले. जंगलातील उत्पादने तर आदिवासींना बाजूला सारून कारखान्यांसाठी जवळपास फुकटात दिली गेलीत. शेतकरी, कारागीर, आदिवासी यांची अशी व्यवस्था झाली की त्यांची उत्पादने त्यांनी स्वस्तात विकावी आणि जीवनावश्यक वस्तूंसाठी चढे भाव द्यावे. सगळ्यात जास्त दुःख याचे आहे की हे सगळे ज्या सरकारांच्या नीतीमुळे झाले, ती सरकारेही ह्याच लोकांनी निवडून दिली आहेत. अशा रीतीने ह्या लोकांची गरिबी त्यांच्या कामचोरीमुळे नाही, तर ती त्यांच्यावर कृत्रिमरीत्या लादली गेली आहे.

**प्रश्न :** गरीबी तर त्यांच्या अडाणीपणामुळे आहे. शिकून सवरून हे लोक चांगले



व प्रतिष्ठित व्हावा याकरिता याच समाजाच्या नेतृत्वात लोकविद्येचे संघटन होणे गरजेचे आहे.

- समाजासाठी योग्य काय आणि अयोग्य काय याचा निवाडा लोकविद्याधर समाज, कुठल्याच तज्ञाच्या नव्हे तर, निव्वळ आपल्या ज्ञानाच्या ताकदीवर करू शकेल असे लोकविद्येचे स्थान म्हणजेच लोकविद्या पंचायत.

## लोकविद्या पंचायत लोकविद्याधर समाजाची अशी ज्ञान पंचायत असेल जिथे

1. शेतकरी, कारागीर, आदिवासी, छोटे व्यावसायिक व महिला आपापले ज्ञान व क्षमता वाढविण्याच्या आणि अधिक समर्थ करण्याच्या उद्देशाने एकत्र जमतील.
2. जात, धर्म आणि सम्प्रदाय यांच्या सीमा ओलांडून लोकविद्याधारक समतेच्या आधारावर एकमेकांशी संवाद साधतील.

## लोकविद्या पंचायत लोकविद्याधर समाजाच्या ज्ञान-मोहिमेचे असे स्थान बनेल की जेथून

1. विभिन्न ज्ञान–क्षेत्रांत होणाऱ्या कमाल आणि किमान मिळकतीचे प्रमाण 5:1 यापेक्षा अधिक असू नये अशी मोहीम चालवली जाईल. (आज सरकारी नोकऱ्यांत हे प्रमाण जवळ जवळ 15:1, तर खाजगी क्षेत्रात जवळ जवळ 100:1 आहे.)
2. हे प्रमाण साधता यावे यासाठी पंचायत बाजारपेठ, शेती, उद्योग, शिक्षण, आरोग्य इत्यादी क्षेत्रांत असलेल्या व्यवस्थांबद्दल प्रस्ताव तयार करून सरकार समक्ष ठेवेल आणि प्रस्तावांच्या समर्थनार्थ तर्क मांडले जातील.

**परिशिष्ट–1**

# लोकविद्या पंचायत

## लोकविद्या पंचायत ही लोकविद्याधारक समाजाची ज्ञान पंचायत होय.

### विचार

- मानव हा एक बौध्दिक प्राणी आहे. ज्ञान आणि विवेक त्याचे स्वाभाविक गुण आहेत.
- शेतकरी, कारागीर, आदिवासी, लहान दुकानदार आणि स्त्रिया अशा बहुसंख्य लोकांनी कधी कॉलेज किंवा विद्यापीठांचे उंबरठे ओलांडले नाहीत. तरी त्यांच्याकडे स्वतःचे असे विस्तृत ज्ञान असते. याच ज्ञानाला लोकविद्या असे म्हणतात. हे सर्व लोकविद्याधर म्हणवतात.
- हे लोक लोकविद्येच्या बळावर आपले कौटुंबिक जीवन चालवतात आणि सर्व समाजाला वस्तू आणि सुविधा पुरवतात.
- राज्यव्यवस्था, मोठ्या बाजारपेठा मोठमोठी सांस्कृतिक प्रतिष्ठाने आणि विद्यापीठे लोकविद्येला गणत नाहीत. समाजातील शक्तिस्थले लोकविद्येला मुळात ज्ञानाचा दर्जाच नाकारतात. लोकांकडील या ज्ञानाचे, लोकविद्येचे कुठलेच संघटन नाही. हेच लोकविद्याधर समाजाच्या दुर्दशेचे कारण होय.
- अशा परिस्थितीत समाजातील नीतीमूल्ये, धोरणे आणि व्यवस्थांच्या बाबतीत लोकविद्याधर समाजाची मते दुर्लक्षिली जातात. परिणामी या समाजासाठी हिताच्या गोष्टी सार्वजनिक पातळीवर ठोस स्वरूपात पुढे येत नाहीत किंवा शासकीय धोरणे आणि व्यवस्था यांवर प्रभाव टाकू शकत नाहीत.
- जोवर लोकविद्या संघटित नसेल तोवर सार्वजनिक क्षेत्रात लोकविद्याधर समाजाला कुठलेच स्थान मिळू शकणार नाही. लोकविद्याधर समाज संपन्न



पैसे कमावू शकत होते. परंतु ते आपल्या जुनाट विचारसरणीला चिकटून राहिल्यामुळे गरीबच राहिले.

**उत्तर :** अडाणी? तुम्हास कोणी सांगितलं की ते अडाणी आहेत? तुम्हांला माहीत आहे का की एका शेतकऱ्यास किती गोष्टी शिकाव्या लागतात ते? त्याला जमीनीची माहिती असावी लागते, हवामानाचा अंदाज शिकावा लागतो. बियाणांची माहिती करून घ्यावी लागते. या सगळ्या गोष्टी बारकाईने शिकायला त्याला वर्षानुवर्षे लागतात. एखाद्या कारागीराला अनेक वर्षांच्या अथक अभ्यास आणि परिश्रमानंतरच निर्मितीचा आनंद घेता येतो. आदिवासींना जंगलातील बारीकसारीक गोष्टी माहीत असतात, त्या समजण्यात त्यांची किती वर्षे गेली असतात. या सगळ्यांनी हे परिश्रमानी मिळवलेले ज्ञान कोणत्याही शाळा–कॉलेजातून घेतले नाही म्हणून काय ते अडाणी, अशिक्षित झाले? तुमच्या सारख्या शिकल्या सवरल्या लोकांची ही मान्यता आहे की शाळा कॉलेजातून विज्ञानाचे शिक्षण घेईल तो ज्ञानी, तो प्रगत! परंतु त्याच वेळेला तुम्ही हे विसरता की याच विज्ञानामुळे माणसाचे आणि निसर्गाचे शोषण होत आहे. विज्ञानामुळे इतर सारे काही दुय्यम, मागासलेले। त्यामुळे या लोकांनी मिळवलेल्या ज्ञानाला तुमच्या लेखी तर काही किंमतच नाही. अशी तुमची मते एकीकडे तुम्ही लोकांवर बिंबवून त्यांच्यावर ज्ञानाचीही गरीबी जबरदस्तीने लादली आहे तर दुसरीकडे त्यांच्यासाठी शैक्षणिक प्रवासाचे मार्ग इतके संकुचित करुन ठेवले की या समाजाला आधुनिक ज्ञानही मिळवणे फार अवघड झाले. अशा रीतीने तुम्ही त्यांना पारंपारिक आणि आधुनिक अशा दोन्ही ज्ञानांपासून वंचित ठेवता आहात. परंतु एक गोष्ट नक्की आहे की आपण सगळ्यांनी मिळून जर हे मनावर घेतलं तर आपण ही कृत्रीम गरीबी दूर करू शकतो.

**प्रश्न :** गरीबांसाठी सरकारतर्फे राबविल्या जाणाऱ्या कल्याण कार्यक्रमांमध्ये या लोकांना भरपूर मदत मिळते. शिवाय एन.जी.ओ. आणि काही

आंतरराष्ट्रीय संस्था ह्या देखिल आहेतच. हे या समस्येच्या समाधानासाठी पुरेसे नाही का?

**उत्तर :** मानव हा बुध्दिजीवी प्राणी आहे. जगण्यासाठी अन्न आवश्यक असले तरी केवळ अन्न हीच त्याची आवश्यकता नाही. त्याला एका वैचारिक आणि सृजनशील वातावरणाचीही गरज आहे, जर असे वातावरण नसेल तर त्याची अवस्था केवळ पशुवत् होईल. म्हणूनच समाजातील आणि निसर्गातील घटकांसोबत प्रेमाने आणि सन्मानाने जगण्याची त्याला गरज आहे. या सगळ्यांचा अभाव असणे ही खरी गरीबी आहे. शिवाय गरीबांना खरे काय हवे आहे हे तर तेच सांगतील ना? परंतु आपल्याकडे मात्र जो तो म्हणजे सरकार, आंतरराष्ट्रीय संस्था, एनजीओ स्वतःच ठरवतात की गरीबांना काय दिले जावे आणि हे सगळे भीक द्यावी तसे दिले जाते. तुम्हाला काय वाटते, याने गरीबी कमी होते की वाढते?

**प्रश्न :** ते बरोबर आहे म्हणा. ह्या आंतरराष्ट्रीय संस्था आणि एनजीओ ह्यांचे वागणे अगदी त्या डॉक्टरांसारखे आहे जे रुग्णांना उगीचच्या उगीच औषधे देवून आपला धंदा चालवू पाहतात! परंतु आमची सरकारं तर आमची आहेत. आम्ही सर्वांनी त्यांना निवडून दिल आहे आणि आता तर राजकारणात बरेच क्षेत्रीय, अनुसूचित जाती–जमातीचे पक्ष सक्रिय आहेत. मग तरीही शेतकरी, कारागीर, आदिवासी ह्यांची ही अवस्था का?

**उत्तर :** हीच तर गोष्ट समजून घेण्याची आहे! राजकीय पक्ष बरेच आहेत. गरीबांचे प्रतिनिधित्व करणारे ही बरेच आहेत. परंतु ह्या सर्वांचे आर्थिक, राजकीय कार्यक्रम तर तेच आहेत की जे एखाद्या भांडवलशाही समर्थक दलाचे असावेत! आज हे सगळे पक्ष कमी जास्त प्रमाणात अमेरिकेसोबत आहेत आणि अमेरिकेच्या नेतृत्वाखाली जागतिकीकरण आणि माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसारामध्येच विकासाला बघू पाहणाऱ्या आर्थिक राजनैतिक धोरणालाच आदर्श मानीत आहेत. या विधानाबाबत मतभेद नक्कीच आहेत, परंतु ते नगण्य आहेत. विकासाची ही मूळ कल्पना जवळपास सर्वंच राजकीय पक्षांनी स्वीकारली आहे. या विकासामुळेच या देशात



प्रयत्नांमधून आपण शोधत असलेल्या सामाजिक विचाराचा नक्कीच जन्म होईल.

**प्रश्न :** परंतु ज्ञानाच्या राजनीतीसाठी काही वाहक–व्यवस्थेची कल्पना करणे गरजेचे आहे.

**उत्तर :** हो, अशा व्यवस्थांची नक्कीच गरज आहे. फक्त व्यवस्थाच नाही तर रचनात्मक कार्यक्रमांची देखिल रूपरेषा आखावी लागेल. त्यासाठी आवश्यक असलेले बीज आपल्याला लोकविद्याधरांच्या जीवनांत आणि संघर्षांतच शोधावे लागतील. खरं तर मी देखील अशाच एका जागेशी संबंधित आहे. विद्या आश्रम, सारनाथ येथे ज्ञानाच्या राजनीतीला आकार देण्याची वैचारिक आणि रचनात्मक प्रक्रिया होते. जगात अन्यत्र देखील यांशी मिळत्या जुळत्या क्रिया होत असतील.

**प्रश्न :** मला याबद्दल अधिक जाणायला आवडेल.

**उत्तर :** मी आपणास काही साहित्य वाचन मनन करण्यास देतो. त्यावर आपण विचार करा आणि चर्चा घडवून आणा. त्याचप्रमाणे तुमची संवेदनशीलता, चिंतन आणि कार्य याव्दारे ज्ञानाची राजनीती लोकांपर्यंत पोचवण्यास मदत करा.

**प्रश्न :** मी तुम्हांस विद्या आश्रमात भेटावयास येईल.

**उत्तर :** आपले स्वागत आहे.

●●●

**प्रश्न :** हे तर मोठेच आव्हान आहे.

**उत्तर :** हो तर! महारोगाला समूळ नष्ट करण्याचे काम काही साधारण थोडेच असेल? असे आहे की पक्षीय राजनीतीमधे सत्ता आणि भांडवलाचे केंद्रीकरण होण्याबरोबरच सत्तेचा बळाने वापर करण्यास सार्थ ठरविले जाते. यामुळेच गरीबांचे प्रतिनिधित्व करणारे पक्ष सुध्दा नाइलाजाने भांडवलशाही व्यवस्थेचा स्वीकार करतात. हे जर असेच चालत राहिले तर कसे व्हावे?

**प्रश्न :** मग काय करावे?

**उत्तर :** ते तर आता संपूर्णपणे लोकविद्याधर समाजावर अवलंबून आहे. यापुढील वाटचाल तेच ठरवू शकतात.

**प्रश्न :** तर मग ज्ञानाची राजनीती काय करेल?

**उत्तर :** ज्ञानाची राजनीती समाजाला ज्ञानाच्या शोषणाविरूध्द आणि खुरटवण्याविरूध्द आवाज उठवण्यास एकत्र आणेल. हा उठाव समाजाच्या कानाकोपऱ्यात पोचवण्याचा प्रयत्न करेल. 'ज्ञानाचा उद्योग' थाटण्याला विरोध व्हावा, ज्ञान समाजाच्या सुखसंपन्नतेचा आधार व्हावा, नफेखोरीचा नव्हे इत्यादी गोष्टी सार्वजनिक पातळीवर चर्चेत आणण्याचे काम ज्ञानाची राजनीती करेल. लोकविद्याधरांमध्ये त्यांच्या ज्ञानावरचा विश्वास मजबूत करण्यासाठी काही नवीन गोष्टींना चालना दिली जाईल. लोकविद्येच्या आर्थिक, सामाजिक, दार्शनिक शक्तींना सामाजिक संघटनांच्या नवीन गोष्टींसोबत जोडून, त्यांचे नवीन उर्जेव्दारे पुनुरूज्जीवन केले जाईल. शिक्षण मार्केटिंग, सॉफ्टवेयर, मीडिया, कला इ. क्षेत्रांशी संबंधित संघटना आणि व्यक्ती यांना ज्ञान क्षेत्रांत होत असलेल्या नवनविन हालचालीबद्दल अवगत केले जाईल. विभिन्न ज्ञान–प्रवाहांमध्ये बंधुत्व वाढवण्यास मदत केली जाईल. वेगवेगळया ठिकाणी सुरू असलेल्या आंदोलनांमधे ज्ञानाला केंद्रीभूत करून नवीन चेतना आणि एकीचा विकास केला जाईल. ह्या सर्व



पैसा आणि ज्ञानाची दिवाळखोरी वाढत चालली आहे. त्यामुळे जोपर्यंत हे राजकीय पक्ष दुसऱ्या कोणत्या पध्दतीने विकास साधता येईल का असा विचार करीत नाहीत तोपर्यंत त्यांच्याकडून आपण काहीच अपेक्षा ठेवू शकत नाही.

**प्रश्न :** वर्तमानपत्र, टीव्ही, मासिके सगळ्यांच्या म्हणण्याप्रमाणे आपला देश माहिती तंत्रज्ञानात अग्रेसर आहे. कम्प्युटर, इंटरनेट, मोबाईल या सर्वामुळे मुनष्याच्या ज्ञानामध्ये आणि विकासामधे भरच पडत आहे. सगळे मोठे मोठे लोक, विव्दान आज हेच म्हणत आहेत, तेव्हा शंकेला थाराच कुठे आहे?

**उत्तर :** खरे आहे! औद्योगिक युगातही हेच लोक होते, ज्यांनी विज्ञानाची अशीच तरफदारी केली होती आणि आज हेच लोक माहिती युगाची तरफदारी करीत आहेत. अशा वेळेला आम्हाला काही विचार तर केलाच पाहिजे की अजून किती वेळ आम्ही या लोकांच्या बोलण्याला भुलणार आहोत? आम्ही एकदा हा प्रयत्न का करीत नाही, की या विषयावर समाजात सखोल चर्चा व्हावी? या चर्चेतून कदाचित आम्हाला एखाद्या मार्ग सापडू शकेल.

**प्रश्न :** शेतकरी, कारागीर, आदिवासी हे लोक तर शिकले सवरलेले पण नाहीत. त्यांना ही गोष्ट कशी जमेल?

**उत्तर :** जखम झाली आहे, तर ती दुखते आहे. हे सांगायला शिक्षणाची काय गरज आहे? जखमी अनेक आहेत. परंतु जे नाहीत, ती पण तर माणसेच आहेत! त्यामुळे मदतीसाठी हातपुढे करणाऱ्यांची कमी नाही.

**प्रश्न :** बरोबर आहे. पण मग कमी कशाची आहे?

**उत्तर :** आत्मविश्वासाची ! स्वातंत्र्यानंतरच्या काळापासून आम्हाला हे सांगण्यात येत आहे, की समाजाच्या विकासासाठी लागणारी ताकद गरीबांकडे नाही. आम्हाला या षड्यंत्राला झुगारून आपली शक्ती ओळखून त्यावर विश्वास ठेवायला हवा. त्यासाठी आत्मविश्वासाची गरज आहे.

**प्रश्न :** तुम्ही निराश झाल्यासारखे वाटता. तुमचा कोणाहीवर विश्वास उरला नाही असे वाटते.

**उत्तर :** छे, छे! मी अजिबात निराश नाही. माझ्या बोलण्याचा असा अर्थ तुम्ही काढला असेलं तर ते चूक आहे. मी तर सुरूवातीलाच म्हटले होते, की गरीबी ही कृत्रिमरीत्या लादली गेली आहे आणि तिला दूर केले जाऊ शकते.

**प्रश्न :** पण तुम्ही तर सरकार, राजकीय पक्ष, आंतरराष्ट्रीय संस्था, कोणत्याही कामगिरीबाबत उत्साहित दिसत नाही. अगदी वैश्वीकरण, विज्ञान, माहिती तंत्रज्ञानातील विलक्षण प्रगतीबाबतही तुम्ही समाधानी नाही.

**उत्तर :** हे बघा, या साऱ्या क्षेत्रातील आपल्या प्रगतीचे मापदंड तुम्ही ठरवालच पण ते ठरवताना गरिबांना किंवा गरीबीला नेहमी गौणच मानले जाईल? तसे झाले तर गरीबी संपण्याची शक्यताच नाहीशी होते. आता आपल्या सांसदीय लोकशाहीच्या सीमा अधिक स्पष्ट झाल्या आहेत. वैश्वीकरणामुळे छोट्या दुकानदार/व्यावसायिकांवर जो अनिश्चतेचा डोंगर कोसळला आहे त्यामुळे गरीबी अधिकच फैलण्याची चिन्हे आहेत.

**प्रश्न :** मग या कम्प्युटर, इंटरनेट आणि मोबाइल ने आणलेल्या माहितीच्या क्षेत्रातील क्रांतीने आम्हाला काहीच मिळाले नाही का?

**उत्तर :** असे नाही. नक्कीच या क्रांतीने आम्हांला बरेच काही शिकवले आहे. परंतु त्याच्यासाठी कोणाला आणि काय किंमत चुकवावी लागते आहे हे कळल्या शिवाय ही क्रांती चांगली की वाईट हे कसे काय ठरवणार? मला सांगा, आज कोणत्याही अर्थव्यवस्थेत प्रत्येकाच्या हातात मोबाईल आणि घरोघरी कम्प्युटर आणि इंटरनेट असणं शक्य आहे का? अरे अजून वीजदेखिल प्रत्येक घरात पोचू शकलेली नाही. तर मग आम्ही कसं मानायचं की या क्रांतीने आमची गरीबी संपेल आणि आमची प्रगती होईल? आणि आता आम्ही असेही म्हणू शकत नाही की ते पाहणं हे आमचं काम नाही. कारण या आधी विज्ञानाच्या सहाय्याने विकासाची



होय. धनदांडग्यांव्दारे पेटेंट बनवून, कम्प्युटरवर संग्रहण करून जणू लोकविद्येवर कब्जाच केला गेला आहे. त्याचप्रमाणे शिक्षण, मार्केट, विविध प्रशासनिक सेवा उदा. बैंक,पोस्ट इ. देखिल कम्प्यूटर, इंटरनेटवर स्थानांतरित होत आहेत. याचाच अर्थ असा की सामाजिक सेवांचा उपभोग घेण्यापासून गरीब वर्ग दूर जात चालला आहे. हे तुमचे शिक्षण, मार्केटिंग, पेटंट, सॉफ्टवेअर, नैसर्गिक साधन संपत्ती यांच्या उपयोगात पावलो पावली ज्ञानावर नियंत्रण ठेवण्याची प्रक्रिया साफ दृष्टीस पडते.

**प्रश्न :** या सर्व क्षेत्रांत लोकांचा होणारा विरोध आपण बघतोच आहोत.

**उत्तर :** हो, विरोध तर सगळीकडेच होतो आहे. आपल्या देशातच नव्हे तर जगात इतरत्रही शेतकरी, कास्तकार, आदिवासी, छोटे मोठे व्यापारी, विद्यार्थी आणि बुध्दीजीवीं तर्फे केली जाणारी रचनात्मक कार्ये आणि विविध आंदोलनांचीही कमी नाही. परंतु हे सगळे प्रयत्न पृथक् आहेत आणि शिवाय यांच्यामधे आपल्या विद्येमधील सुप्त शक्तीची जाणीव आणि तिच्या होणाऱ्या शोषणाबद्दलची जागरूकता नाही. त्यामुळे या आंदोलनांना केवळ संरक्षणात्मक स्वरूप येत चालले आहे.

**प्रश्न :** होय, चित्र तर असेच दिसत आहे.

**उत्तर :** तर अशा परिस्थितीत ज्ञानाबद्दलची राजनीती या स्फुल्लिंगाच्या प्रसारामधे वाहकाचे काम केरल.

**प्रश्न :** होय, हे शक्य आहे. परंतु ही राजनीती होणार कशी? त्यासाठी काय एखाद्या पक्षाची उभारणी करावी लागेल?

**उत्तर :** आज घडीला पक्षीय राजनीतीचे जे बिघडलेले स्वरूप आहे, ते पाहू जाता पक्ष स्थापनेचा विचारच करू नये. शिवाय लोकविद्येमधे संकुचित हितांना आणि विचारांना काहीच स्थान नाही. पक्षीय राजनीतीमधे ज्याप्रकारे सत्तेचा उदय होतो. त्यामुळे गरीब/श्रीमंत असा भेदभाव केला जाऊ नये, या वास्तवाकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे गरीबांकडे दुर्लक्ष आणि श्रीमंतासमोर गुडघे टेकणे अशी राजनीती जर करायची नसेल तर सत्तेच्या नवीन वाटा धुंडाळाव्या लागतील.

सामाजिक शोषण, राजनैतिक गुलामी अथवा चमचेगिरी, सांस्कृतिक दडपशाही आणि लहान–मोठा भेदभाव यापासून मुक्त असेल, तर त्यासाठी आपल्याला नवी चळवळ उभारावी लागेल. या चळवळीला ज्ञानाधारित राजनीतीही म्हणता येईल.

**प्रश्न :** जरा विस्ताराने सांगाल का?

**उत्तर :** असं बघा, की माहिती युगाचा दिवसागणिक विस्तार होत चाललाय आपल्याला याचा आनंद का होतो? आपल्याला असे वाटते की यामुळे मोठी ज्ञानाधारीत समाजनिर्मिती होते आहे. ज्ञानोद्योग, ज्ञानोत्पादन, ज्ञान–दान, ज्ञान–राजनीती अशा ज्ञानाशी संबंधित म्हणी देखिल प्रचलित होऊ लागल्या. कम्प्युटर, इंटरनेट, मोबाईल इ. उद्योगांमध्ये प्रचंड भरभराट होते आहे आणि त्याचप्रमाणे माहिती प्रसारणावर आधारित इतर उद्योग जसे– मीडिया, मनोरंजन, शिक्षा इ. सुध्दा प्रगती प्रथावर आहेत. या विस्तारालाच आपण ज्ञानाधारित समाजाची निर्मिती म्हणतो. परंतु यासाठी कोणी आणि किती किंमत चुकवली आहे, हे आपणांस माहीत आहे काय? तसं म्हणायला हे ज्ञानाधारीत युग आहे. परंतु वास्तवात मात्र हे निव्वळ ज्ञानाच्या शोषण आणि आधिपत्याचे युग आहे. सामान्य माणसाला ज्ञानाच्या प्राप्तीपासून आणि स्वतःच्या ज्ञानाचा वापर करण्यापासून वंचित करणरी व्यवस्था रूढ होते आहे.

**प्रश्न :** ती कशी काय?

**उत्तर :** स्थूल मानाने पाहू जाता हे स्पष्ट होते. उदाहरणदाखल पहा– सध्या शिक्षण किती महाग झाले आहे बरे? याचाच अर्थ असा की गरीबांपासून शिक्षणाचा अधिकार हिरावून घेतला जातो आहे. शिवाय कम्प्युटर,, इंटरनेट इ.वर उपलब्ध असलेली माहिती देखिल सामान्य जनतेपर्यंत पोचू शकत नाही. लोकविद्येमधे अंतर्भूत असलेल्या शेती, कास्तकारी, इत्यादींचे महत्व समाजामध्ये लयाला जाऊ लागले आहे. लोकविद्येच्या शोषणाबद्दल तर आपण याआधीही बोललेच आहोत. लोकविद्याधरांना याप्रकारे बेदखल करणे म्हणजेच त्यांना त्यांच्या ज्ञानापासून दूर ठेवणेच



घोषणा करणाऱ्यांवर आंधळा विश्वास ठेवून आम्ही पस्तावलो आहोत. त्यामुळे निसर्ग आणि समाजाला त्या गरीबीच्या महारोगाची कीड लागली म्हणूनच आता ह्या नव्या क्रांतीने साधल्या जाणाऱ्या विकासाच्या दाव्याला नीट पारखल्याशिवाय आम्ही पाठिंबा देणार नाही आणि कुणाला देऊही देणार नाही.

**प्रश्न :** तुम्ही ज्या सोप्या पध्दतीने ह्या गोष्टी सांगताय त्यामुळे मला त्यावर मनापासून विचार करावासा वाटतोय. मी कधी या विषयावर त्याप्रकारे विचारच केला नाही. कदाचित तुम्ही म्हणता त्या गोष्टींमध्ये सामाजिक परिवर्तनाची गुरुकिल्ली असेलही. परंतु अजूनही मनात बऱ्याच शंका आहेत. प्रश्न आहेत ज्यावर चर्चा व्हावी असं वाटत आहे. परंतु तुम्हाला वेळ आहे का?

**उत्तर :** जरुर! उद्या मी येथून जवळच 20 कि.मी.वर वडस्याला जात आहे. तेथे शेतकरी, कारागीर इत्यादींसोबत वैनगंगे च्या किनारी सुखदुःखाच्या गोष्टींची चर्चा करायची आहे. वेळात वेळ काढून तुम्हीही तिथे या. तिथेच आपण या विषयावर आणखी बोलू.

**प्रश्न :** नक्कीच. मी जरुर येईन.

●●●

# २ ज्याची विद्या त्याची शक्ती

ब्रम्हपुरी–वडसा रस्त्या लगत वैनगंगे काठी 20–25 जण जमा आहेत. हे सारे जण वडसा आणि आसपासच्या 4–5 गावातून जमा झाले आहेत. त्यांत कुणी शेतकरी आहे, कुणी विणकर आहे, कुणी मजुरी करतात तर काही बेरोजगारही आहेत. चर्चा सुरु झाली. प्रत्येकजण आपल्या समस्या मांडू लागला. कुणी मंदीबद्दल, कुणी व्यवसायात झालेल्या नुकसानीबद्दल तर कुणी शासनाच्या उदासीनतेबाबत आपले म्हणणे मांडू लागले. परिसरातील दोन विणकरांनी कुटुंबासहित आत्महत्या केली. त्याबद्दल कळकळीने बोलू लागेल. कारणांबाबत चर्चा करू लागेल. करता करता हळूहळू संध्याकाळ होऊ लागली आणि अंधार पडू लागला. अंधारात वैनगंगेचे पाणी अधिकच काळे दिसू लागले. घराघरातून निघत असलेल्या धुराने वातावरणाला अधिकच उदास बनवले. त्यामुळे चर्चा समाप्तीचा निर्णय घेण्यात आला. बैठकीत काहीच निर्णय न झाल्याने पुन्हा दोन दिवसांनी बसण्याचे ठरले. मागील प्रकरणातील आमचे प्रश्न–उत्तर करणाऱ्या दोघांनी रात्र वडस्यातच घालवण्याचे ठरवले, आणि जेवणानंतर परत आपल्या कालच्या चर्चेचा आरंभ केला.

**प्रश्न :** सध्या जगासमोर पर्यावरणाचा होणारा ऱ्हास किंवा ऋतूंमधील होणारा बदल ही सगळ्यात भीषण समस्या आहे असे मोठे मोठे पुढारी, वैज्ञानिक आणि विचारवंत सतत मांडत असतात. तुम्ही गरीबी ही सगळयात मोठी समस्या आहे असे मानता, परंतु याची फारशी चर्चा होताना दिसत नाही.

**उत्तर :** ज्याचं जळतं त्यालाच कळतं, दुसरा ते दुःख समजून घेऊ शकत नाही. मी आधीच म्हटले आहे की निसर्ग आणि मानव दोघांवरही गरीबी जबरदस्तीने लादली गेली आहे आणि दोन्हींच्या उगमाचे कारण एकच आहे. त्यामुळे यापैकी फक्त एकाच्याच गरीबीबद्दल बोलत राहणं न्याय्य नाही.



सरकारे आहेत. तिथे काय व्यवस्था आहे याचा तुम्ही शोध घेऊ शकता. परंतु एक गोष्ट मात्र सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे की, आज जगातील सगळे गरीब लोकविद्येच्या सहाय्यानेच आपले जीवन व्यतीत करीत आहेत. लोकविद्येचे सार्वभौमत्व निर्विवाद आहे.

**प्रश्न :** म्हणजे?

**उत्तर :** असं पहा की जगाच्या कानाकोपऱ्यात लोकविद्येचे अस्तित्व आहे किंवा असे म्हणूया की जिथे मनुष्य आहे तिथे लोकविद्या आहे. स्थळ आणि काळाप्रमाणे लोकविद्येचे स्वरूप वेगवेगळे वाटत असले तरी त्यामागील वैचारीक तत्वे एकमेकांशी मिळतीजुळतीच आहेत. लोकविद्या ही एक अशी शक्ती आहे जिच्यामध्ये जगातील प्रत्येक मनुष्याच्या स्वत्वाच्या सन्मानाची वैचारीक बीजे रोवली आहेत. तिनेच त्यांना निर्वाहाची दिशा आजवर दाखवली आहे व यापुढेही दाखवत राहील.

**प्रश्न :** परंतु आज जगामध्ये कोठेही लोकहितकारी परिवर्तन घडवून आणू शकेल अशी शक्ती किंवा विचार समाजामध्ये अस्तित्वात असल्याचे दृग्गोचर होत नाही. एके काळी समाजवादी विचारसरणी मधे ती शक्ती होती, परंतु आज घडीला तसे दृष्टीस पडत नाही. त्यामुळे तुम्ही जेव्हा लोकविद्या जगाच्या कानाकोपऱ्यात अस्तित्वात असल्याची ग्वाही देता, ते ऐकून खूप स्फूर्ती येते आहे आणि एकत्वाच्या शक्तीचा प्रत्ययही येतो आहे.

**उत्तर :** खरोखर ह्या एकत्वाच्या शक्तीला डोळसपणे बघण्याची आज गरज आहे. जगातील लोकविद्याधर समाजाच्या ज्ञानाशी होत असलेला दुर्व्यवहार आणि लूट समजून घेण्याची गरज आहे. ठिकठिकाणी अजूनही अस्तित्वात असलेल्या लोकविद्येमधील निहित ताकदीला तेथील लोकविद्याधारांनी ओळखून तिच्या बळावर मुक्तीच्या विचारांना मूर्त रूप देण्याची आज गरज आहे. निसर्गाला आणि समाजाला लागलेल्या महारोगाचे निवारण करण्यासाठी लागणारे जालिम औषधही तिच्याकडेच आहे.

**प्रश्न :** परंतु हे सारे घडावे कसे?

**उत्तर :** जर आपल्याला अशा समाजाची निर्मिती करायची आहे की जो आर्थिक,

# ८ ज्ञानाची राजनीती

एक महिन्यानंतरचा काळ ........ स्थान शहरातील सगळ्यात व्यस्त असा बाजार. बाजारातील एका कोपऱ्यात दोन व्यक्तींमध्ये नमस्कार–चमत्कार होताना दिसत आहे. अरे, हे दोघे तर आपले परिचितच आहेत.... ऐकूया तर ते काय बोलतायत.

**प्रश्न :** अरे वा पुष्कळ दिवसांनी भेट झाली. मधे मी तुमच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला परंतु तुम्ही शहरात नाही, असं कळलं.

**उत्तर :** मी जरा बाहेर गेलो होतो. एका जुन्या मित्रासोबत सध्या जी जागोजागी विशेष आर्थिक झोन (सेझ) बनत आहेत, त्या ठिकाणी भेट देण्याचा योग आला.

**प्रश्न :** मी असे ऐकले आहे की ही विशेष आर्थिक क्षेत्रे बनवण्यासाठी शेतकऱ्यांकडून भूमी अधिग्रहित केली जात आहे आणि याला शेतकऱ्यांचा विरोधही आहे.

**उत्तर :** हे सगळे आपल्याला कुठे घेऊन जाणर आहे, कोणास ठाऊक! परंतू तुमच्यासोबत गप्पा गोष्टी करायचा आपला करार मला लक्षात आहे.

**प्रश्न :** तुम्हाला थोडा वेळ असेल तर चहा पिता पिता आपल्या गोष्टी पुढे सुरु करूया. राष्ट्रीय आणि आंतराष्ट्रीय राजनीतिमध्ये ज्या वेगाने घटना घडताहेत त्यामुळे लोकविद्येबाबत आणखी बरेच काही जाणून घेण्यास मी उत्सुक आहे.

**उत्तर :** चला.

**प्रश्न :** मागच्या महिन्यात मी बऱ्याच मित्रांना भेटलो आणि त्यांच्याशी लोकविद्येबाबत गोष्टी केल्या. लोकविद्येमध्ये अंतर्भूत असलेल्या ताकदीला कुणीही नाकारू शकत नाही.

**उत्तर :** परंतु याच्या सहाय्याने समाज परिवर्तन करू शकेल अशी वैचारिक क्रांती कशी उभी करावी हे समजत नाही. हं. हेच तर चॅलेंज आहे. आज जगातील बहुतेक देशांमध्ये भांडवलशाही व्यवस्था आहे. जिथे कम्युनिस्टांची



**प्रश्न :** तुम्ही सतत तुमचं म्हणणं मांडता की गरीबी कृत्रिम आहे आणि समाजाने ठरवल्यास ती दूर केले जाऊ शकते. परंतु आज हे जे लोक जमले होते, त्यांच्याकडून ही अपेक्षा केली जाऊ शकते? त्यांच्यात तर काही ताकदच नाही.

**उत्तर :** मला नाही असं वाटत की त्यांच्यात ताकद नाही. परंतु त्यांना कुणाला त्यांच्या ताकदीची जाणीवच नाही. त्यामुळे ही जाणीव स्वतः करणे आणि त्यांना करून देणे हे अतिशय गरजेचे आहे.

**प्रश्न :** या गरीबांपाशी असं काय आहे की ज्याला तुम्ही ताकद म्हणताय?

**उत्तर :** त्यांच्या पाशी जी विद्या आहे तीच त्यांची ताकद आहे. असं पहा हे सारे गरीब लोक वेगवेगळ्या क्षेत्रातील आहेत. कुणी शेतकरी, कुणी कारागीर, आदिवासी तर कुणी छोटे व्यावसायिक आहेत. त्यांच्याकडे आधुनिक शिक्षण नाही, पैसा नाही, पदांची ताकदही नाही. त्यांची शक्ती त्यांच्याकडे असलेल्या ज्ञानामध्ये आहे. मी आधीही म्हटलं आहे की यांना अशिक्षित किंवा अडाणी म्हणणं फार चुकीचं आहे. यांचं ज्ञान लोकविद्या म्हणून ओळखलं जात. इतर कोणत्याही ज्ञानापेक्षा त्याचा खजिना कितीतरी मोठा आहे. आणि हे सारे लोकविद्याधर आहेत. लोकविद्येच्या जोरावर हे गरिबीचं जोखड तर झुगारून देऊ शकतीलच शिवाय संपूर्ण समाजालाही निसर्गाशी एकरूप होऊन जीवन जगण्याच्या पध्दतींनी सज्ज करू शकतील. एवढेच नव्हे तर समाजामध्ये समता आणि न्यायप्रियता ही रूजवू शकतील.

**प्रश्न :** तुमचं म्हणणं मला तरी अतिशयोक्त वाटतं. आजवर असं तर कोणत्याही विचारवंतानं म्हटल्याचं ऐकीवात नाही, अगदी युरोप, अमेरिकेतील देखिल नाही.

**उत्तर :** कदाचित असं असू शकेल कारण की वैचारिक मार्ग दर्शनासाठी नेहमीच युरोप, अमेरिकेचे तोंड पाहण्याची आम्हाला सवय लागली आहे. तुम्ही कधी पूर्वेकडील विचारवंतांचं म्हणणं ऐकलं किंवा वाचलं आहे का?

असेल तर तुम्हाला हेही माहीत असेल की त्यांनी नेहमीच 'आपली' ताकद ओळखण्याला प्राधान्य दिले आहे. ह्या ताकदीची ओळख प्रत्येक युगात माणसाला नव्याने झाली आहे आणि हिच्याच क्षमतेवर समाजात लोकहितकारी बदल घडवून आणणं शक्य झालेले आहे. आज ही ताकद लोकविद्येत आहे. आपण तिला आजही आजमावून पाहू शकतो.

**प्रश्न :** लोकविद्या काय आहे? आणि तुम्हास तिच्यात एवढी ताकद कशी काय दिसते? कृपया मला जरा सविस्तर सांगा. मला खूप उत्सुकता आहे ऐकायची.

**उत्तर :** या गोष्टी अशा पटकन सांगून समजण्यासारख्या नाहीत. आपण हळूहळू विचार विमर्श करीत राहू. तुम्हाला त्या आपोआपच समजतील.

**प्रश्न :** तर मग आपण असं करू की तुम्ही तुमच्या पध्दतीने बोला आणि जिथे मला शंका येईल किंवा काही समजलं नाही तिथे मी तुम्हाला विचारीन.

**उत्तर :** असं म्हणता! ठीक आहे. मी प्रयत्न करतो. असं पहा की लोकविद्या हे समाजाधिष्ठित ज्ञान आहे. लोकविद्येची नाळ ही कोणत्याही जाती, धर्म, संप्रदाय, विद्यापीठे किंवा पुस्तकांशी बांधली जाऊ शकत नाही. ती समाजातील सगळ्यांची आहे आणि कोण्या एकाची किंवा काही लोकांची मिंधी नाही. ही लोकातच राहते, तिथेच उगम पावते आणि तिथेच तिचे नवनवीन आविष्कार होतात, हिचा जन्मच मुळी मानवासोबत आणि मानव समाजासोबत झाला आहे आणि पृथ्वीवर जोपर्यंत मुनष्याचं अस्तित्व आहे तोपर्यंत ती त्याचं जगण्याचं साधन बनून राहील.

**प्रश्न :** फारसे काही कळलं नाही. थोडं अधिक विस्ताराने सांगाल?

**उत्तर :** ठीक आहे. शाळा, कॉलेज, विद्यापीठे यांच्या बाहेर जे ज्ञान आहे ते लोकविद्या आहे. म्हणजे असं की समाजातील बहुसंख्य लोकांनी ज्या



'असत्' च्या परावभवाचा मार्ग मानला आहे. विशेष म्हणजे आपला प्रत्येक विचार व कृति पारखून त्यातील हीण गाळून टाकणे व अपप्रवृत्तींना बांध घालणे हे लोकविद्येचे मूलतत्व आहे. अर्थातच भांडवलशाही जगाप्रमाणे येथे अन्याय किंवा अनीतीला जागाच नाही.

**प्रश्न :** खरे आहे. अनेक अपप्रवृत्तींचा उगम औद्योगिक युगातच झालेला दिसतो आणि त्यामुळे समाजाचे संतुलन ढळले आहे.

**उत्तर :** आज बोलताबोलता फार उशीर झाला. आता हे धरणे आंदोलनही संपत आले. तरी एक सांगतो. सगळीकडे मिळून मिसळून तुम्ही या सर्वांवर विचार करा व वेळोवेळी चर्चाही करा.

**प्रश्न :** पण महत्वाचा प्रश्न असा आहे की लोकविद्येतील शक्तीचा संयोग कसा होईल व ती कोणत्या रुपाने प्रकट होईल?

**उत्तर :** आजच्या काळात लोकविद्येतील राजनैतिक बळच हे घडवू शकेल. पुढच्या भेटीत यावरच चर्चा करू.

●●●

सुरूवात केली. बटबटीत भडक धार्मिकतेची सुरूवात या काळात झाली आणि सण उत्सव व धर्मसोहळ्यांचे बाजारू पध्दतीने आयोजन करणे हा प्रघात सूचना युगात रूढ झाला. त्यात ना कलात्मकताही उरली ना सत्य!

**प्रश्न :** मग लोकविद्येने या माहिती युगाला नाकारले पाहिजे का? की खुलेपणाने तिला दडपण्यासाठी दंड थोपटावे?

**उत्तर :** लोकविद्येत असा विचार संभवतच नाही. बंधुभाव आणि अहिसेंची सौम्य तत्वं हा तर लोकविद्येचा पाया आहे. आपण हे यापूर्वीच पाहिले आहे की परस्परांमध्ये सलोख्याचे संबंध निर्माण करणे आणि सतत त्यांना प्रगाढ करणे हे लोकविद्येतील निहित तत्व आहे. जी विद्या प्रगाढ सौख्याचे संबंध निर्माण करण्यावर भर देते तिच्यात अशा कोणत्याही वैरभावाला स्थान नाही. विज्ञानाने लोकविद्येचा दुस्वास केला पण लोकविद्या मात्र विज्ञानाबद्दल आकस बाळगीत नाही. सूचना प्रौद्योगिकीशीही लोकविद्या सौहार्द्रपूर्ण संबंध विकसित करू शकते. मात्र मुकाटयाने अन्याय सोसणे ही लोकविद्येची मूळ वृत्ती नाही.

**प्रश्न :** मग अन्यायनिवारणाचा मार्ग तरी कोणता?

**उत्तर :** तो आता यापुढे आखला जाईल. सध्या तरी आपण लोकविद्येची बलस्थाने शोधू या, जी नव्या स्वतंत्र मुक्त जीवनासाठी दंड थोपटतील आणि अशा बलस्थानांची जाणीव झाली की समाजात चेतना निर्माण होईल. त्यातच अधिक न्यायाधिष्ठित समाजनिर्माणाची बीजे आहेत.

**प्रश्न :** खरे आहे, तुम्ही आम्हाला लोकविद्येच्या माध्यमातून आपली बलस्थाने ओळखायला शिकवलत हे फार बरे झाले. लोकविद्या हे श्रेष्ठ ज्ञान आहे खरे. पण आपल्या समाजात कितीतरी त्रुटी आहेत आणि त्या लोकविद्येची उपासना करणाऱ्या समाजातही आहेत. त्या दूर करायला हव्या असे तुम्हाला वाटत नाही का?

**उत्तर :** वाटते ना। समाजातील या त्रुटी दूर केल्याच पाहिजेत. पण त्यांची केवळ चर्चा करणे पुरेसे नाही. लोकविद्येच्या परंपरेत 'सत्'चे निर्माण हाच



ज्ञानाच्या आधारावर स्वतःला आणि समाजालाही जिवंत ठेवलं आहे ते ज्ञान म्हणजे लोकविद्या आहे. उदाहरणच घ्यायचं झाले तर एक शेतकरी, जो धान्य, भाज्या पिकवतो, तो हे स्वतःच्या ज्ञानाच्या आधारावर करू शकतो. असं ज्ञान की जे त्यानी शाळा कॉलेजात शिकून मिळवलेलं नाही तर आपल्या वाडवडिलांकडून मिळवल आहे. त्या ज्ञानामध्ये तो स्वतःच्या अनुभवातून आणि गरजेप्रमाणे भर घालतो. काही नव्या तंत्रज्ञानासंबंधी माहिती मिळाली तर तिचा स्वतःच्या कामामध्ये कसा उपयोग करून घ्यायचा हे ही तो जाणतो. तसंच कारागीरांचही आहे. सुतार, लोहार, कुंभार, वडारी, शिल्पकार, कासार तसेच काच, प्लास्टिक, कापूस, कागद, धातू यांपासून जीवनावश्यक वस्तू उत्पादित करणारे असंख्य कारागीर हे सारे लोकविद्येचे धनी आहेत. त्याचप्रमाणे आदिवासी आणि बायका सुध्दा लोकविद्येच्या धनी आहेत. यांनी सगळ्यांनी आपलं ज्ञान समाजातून मिळवलेलं आहे. या सर्वांपाशी लोकविद्येचा खजिनाच आहे आणि हीच त्यांची ताकद आहे.

**प्रश्न :** ठीक आहे. आता मी हे समजू शकतोय की जो माणूस शिकला सवरलेला नाही, त्याला अडाणी म्हणणं चुकीचं आहे. त्याच्याकडे शिक्षण नसेल परंतु तो ज्ञानी आहे. आता मला असं विचारायचं आहे की त्यांच्या जवळचं ज्ञान म्हणजे लोकविद्या तर मगासलेली आहे. त्याच्या बळावर त्यांची आणि समाजाची उन्नती होणं कसं शक्य आहे?

**उत्तर :** सामान्य जनांचा संदर्भ घेतल्याशिवाय समाजाची उन्नती, विकास आणि प्रगतीच्या कल्पनांची व्याख्या होऊ शकत नाही हे मी याआधीही स्पष्ट केले आहे. गरीब लोक म्हणजे शेतकरी, कारागीर, आदिवासी, छोटे दुकानदार यांची संपन्नता, सक्रियता, पुढार, हस्तक्षेप आणि नियंत्रण वाढवणारी व्यवस्था त्यांच्या स्वतःच्या ज्ञानाच्या पायव्या वरच उभी होऊ शकते.

दुसऱ्या कुणाच्या विद्येच्या जोरावर आमची ताकद वाढू शकत नाही.

ज्यांची विद्या असते, त्याचीच ताकद असते. स्वातंत्र मिळाल्यानंतर पश्चिमेकडील सभ्यतेची विद्या आपण आत्मसात केली आणि सुबत्तेची स्वप्न बघू लागलो. परंतु विद्या त्यांची असल्याने ती वापरल्याचा फायदाही त्यांनाच झाला. प्रगत आणि अप्रगत विद्येची व्याख्या तुम्ही काय कराल? मला तर असं वाटतं की ज्या विद्येमुळे समाजातील बहुसंख्यांना रोजगार मिळतो, जिच्यामुळे निसर्गाशी एकरूप होऊन जीवन जगणे शक्य होते, जिच्यामध्ये सत्ता आणि पैसा याच्या ताकदीला विरोध करण्याचं सामर्थ्य आहे, ती विद्या प्रगत आहे असं मानलं पाहिजे आणि ज्या विद्येच्या बळावर प्रचंड उत्पादन करणे शक्य होवूनही उत्पादकांना मात्र गरिबीचा सामना करावा लागतो, जिच्यामध्ये ऐशोआरामचे आयुष्य व्यतीत करण्यासाठी निसर्गाचा मनमाना नाश करण्याची मुभा आहे, जिच्यामुळे प्रत्येक क्षेत्रात उच्च–नीच हा भेदभाव निर्माण होतो, त्या विद्येला अप्रगत असेच मानले पाहिजे.

**प्रश्न :** म्हणजे तुम्हाला असं वाटतं की लोकविद्या प्रगत आहे.

**उत्तर :** निःसंशय! आणि तिच्यामध्ये मोठेमोठे चमत्कार करण्याची ताकद आहे, म्हणून ती प्रगत आहे असे नाही तर साऱ्या मनुष्य समाजाला सन्मानाने जगू देण्याची क्षमता हिच्यात आहे म्हणून! ही मनुष्याची साथ कधी सोडत नाही. निरंकुश आणि अत्याचारी सत्ता हिला नष्ट करण्याचे प्रयत्न करीत राहतात परंतु ही कधी नष्ट झाली नाही आणि कधी केलीही जाऊ शकत नाही.

**प्रश्न :** ते कसे काय?

**उत्तर :** आमच्याच देशाचे उदाहरण घ्या. इंग्रजांनी लोकविद्येला नष्ट करण्यात काही कमतरता ठेवली नाही. शेतकऱ्यांना नागवले, कारागीरांच्या उत्पादनाची नासाडी केली. आदिवासींना जंगलातून हुसकवायचा प्रयत्न केला परंतु या साऱ्या विपरीत परिस्थितीतही ह्या लोकांना लोकविद्येचीच मदत झाली. त्याच्याच बळावर हे जिवंत राहिले आणि समाजासाठी



शोध लागताक्षणीच त्यांनी आपला मोहरा तिकडे वळवला. त्यांच्या दृष्टीने लोकविद्या ही 'ज्ञानाची' नव्हे तर माहिती पुरविणारी 'द्रौपदीची अक्षय थाळी' आहे. लोकविद्येतील कृषी, उद्योग, वास्तुनिर्मिती, संगीत, वस्त्रनिर्माण, पाकशास्त्र या सर्व क्षेत्रातील माहितीची त्यांनी लूट चालविली आहे.

**प्रश्न :** पण तुम्ही त्याला लूट का म्हणता?

**उत्तर :** मग काय म्हणणार? या ज्ञानभांडाराकडे त्यांनी आपली लोभी दृष्टी वळविली, कुठलाही विधिनिषेध न बाळगता, साम–दाम–दंड–भेद अशा सर्व मार्गांनी त्यांनी लोकविद्येतील ज्ञानाला स्वतःच्या फायद्यासाठी वेठीला धरले, याला लूट नाही तर आणखी काय म्हणणार?

**प्रश्न :** पण या सर्व विद्या–कला लुप्त होऊ नयेत म्हणूनच ते हे ज्ञान गोळा करीत आहेत ना?

**उत्तर :** असे म्हणून ते आणखी दिशाभूल करीत आहेत. या बाहेरच्या मदतीशिवाय त्या लुप्त होतील असे म्हणणे खोटे आहे. आजपर्यंत ज्यांनी ही विद्या जिवंत ठेवली, आता त्यांचाच हाती राहून ती नष्ट कशी होईल? खरे कारण हे आहे की लोकविद्येतील अमर्याद ज्ञानाची पुनर्मांडणी केली की त्यांना नफा कमविण्याचे नवेनवे मार्ग उपलब्ध होतील. या पारंपारिक ज्ञानाला नव्याने मांडताना त्यात थोडेसे बदल केले की पेटंट घेता येतील आणि मग ज्ञानाच्या या खजिन्यावर त्यांचा हक्क प्रस्थापित होईल. ही तर लूटच आहे ना?

**प्रश्न :** खरच! मला तर वाटलेच नाही की सूचना प्रौद्योगिकी आणि ज्ञान व्यवस्थापनाच्या भक्कम पाठिंब्यावर उभ्या असलेल्या ज्ञान उद्योगाचा खरा चेहरा असा असेल!

**उत्तर :** लोकविद्येतील ज्ञानाला वेठीला धरण्याचा हा सुनियोजित कट आहे. यामुळे लोकविद्येचे शोषण सुरू झाले आणि हे ज्ञान विकृत स्वरूपात सादर करताना त्यांनी दिखाऊ–बेगडी मनोरंजन समाजात रुजविले त्याचबरोबर सभ्यतेच्या कल्पनांना हरताळ फासून अश्लील मनोरंजनाचीही

**प्रश्न :** खरे आहे, शिक्षण, वैद्यकीय सेवा आणि मनोरंजन हे आजकाल भरभराटीस आलेले 'व्यवसाय' मानले जातात. पण त्यामुळे अनैतिक अशा संस्कृतीचाच प्रसार आपल्या समाजात होत नाही का?

**उत्तर :** होतो तर! या क्षेत्रात लोकविद्यावंतांची फसवणूक होताना दिसत नाही का? आणि आजकाल नैतिक–अनैतिकतेचा विचार तर जणू त्याज्य ठरला आहे. मीडियाने तर त्याला पूर्णपणे तिलांजली दिलेली दिसते. माहितीयुगात नैतिक–अनैतिकतेमधील अंतर कमी झालेले दिसते.

**प्रश्न :** का बरं ?

**उत्तर :** कारण या युगात 'ज्ञाना'ची प्रतिष्ठा नव्हे तर माहितीचे एकत्रीकरण महत्वाचे मानतात. ज्ञानाला आदराने न वागवता, माहितीच्या तुकड्यांचा दर्जा देतात. आजकाल लोकविद्येच्या संगणकीकरणचा प्रयत्न होताना दिसतो तो याच वृत्तीच्या आधारे!

**प्रश्न :** त्यामुळे काय होईल?

**उत्तर :** प्रथम हे लक्षात घ्या की ज्ञान म्हणजे केवळ माहितीचा साठा नव्हे. ज्ञानाचा आधार त्यातील निहित तत्वे असतात. ती तत्वे वगळली तर ठरलेली माहिती हे 'राक्षसी हत्यार' ठरेल. लोकविद्या ही माणसा–माणसातील व माणूस आणि निसर्ग यातील संबंध सुदृढ आणि परस्परोपयोगी असण्यावर भर देते व समाजाच्या दैनंदिन क्रिया या तत्वाचे संवर्धन करणाऱ्या असतील याची काळजी घेणे. तत्वे वगळून फक्त माहिती असे लोकविद्येचे स्वरूप कधीच नव्हते हे आपण पाहिलेच आहे. माहितीयुगात मात्र नेमकी त्यांचीच फारकत केली जाते. तत्वे समजावून न घेता माहितीचा ढीग तयार केला जातो.

**प्रश्न :** पण यापासून त्यांना काय फायदा मिळणार?

**उत्तर :** सूचना युगात 'माहिती' हे भांडवल मानले जाते. त्यामुळे हे भांडवल वाढण्याकडे संबंधितांचा कल असतो. सर्व प्रकारच्या ज्ञानप्रवाहातून माहिती गोळा करून तिचे सुसूत्रीकरण करणे हा आजकाल एक मोठा व्यवसाय बनला आहे. विज्ञानापलिकडेही ज्ञानाचे भांडार खूप मोठे आहे याचा



अन्न, वस्त्र, निवारा पुरवत राहिले. त्यांच्या भूमिकेला स्वातंत्र्यानंतरही प्रतिष्ठा मिळाली नाही. विद्यापीठांतून शिकलेल्या लोकांनी लोकविद्येचा तिरस्कारच केला. सरकारने देखिल यांच्या उद्योगांना सहाय्य करण्याऐवजी दुर्लक्षित केलं आणि श्रीमंतांच्या उद्योगांना तऱ्हेतऱ्हेच्या सुविधा आणि प्रोत्साहन प्रदान केलं. तरीही लोकविद्या नष्ट झाली नाही. आजही तिच्या सहाय्याने निर्माण झालेले उत्पादन आधुनिक तंत्रज्ञानातून तयार झालेल्या उत्पादनांपेक्षा कुठेही कमी नाही. ही किमया लोकविद्येची नाही तर कुणाची आहे?

**प्रश्न :** हो, हे तर खरं आहे की इंग्रजांच्या राज्यात सगळ्यात जास्त वाताहात लोकविद्याधरांचीच झाली आहे आणि आजही होते आहे. तुमच्या बोलण्यावरून लोकविद्येमध्ये ताकद आहे हे पटलंय पण प्रश्न असा पडतोय, की लोकविद्येचे असे शोषण का आणि किती दिवस होणार आहे? ते थांबवता कसे येईल?

**उत्तर :** हा तर सगळ्यात महत्वाचा प्रश्न आहे परंतु त्याचे उत्तर इतक्या सहज मिळणार नाही. सर्वप्रथम लोकविद्येची अधिक माहिती करून घेण्याची आवश्यकता आहे. आता रात्र बरीच झाली आहे. आपण आपली चर्चा इथेच थांबवू यां.

**प्रश्न :** आपल्या चर्चेतून मला पुष्कळ अशा गोष्टींमध्ये अर्थ जाणवला ज्यांना एरवी मी पाहून न पाहिल्यासारखे करतो. खरं तर इतक्या साध्या गोष्टीही मला समजून घेता आल्या नाहीत याचा खेद होतो. आपली चर्चा अजून सुरू रहावी असे वाटते. उद्या तर मला घरी गेले पाहिजे. परंतु दोन दिवसांनी मी परत येथेच येऊ का? आपल्याला चर्चा करता येईल?

**उत्तर :** नक्कीच.

●●●

# ३ लोकविद्या म्हणजे काय?

दोन दिवसानंतर वडस्याला वैनगंगेच्या तीरावर पुन्हा तीच मंडळी चर्चेसाठी हजर झाली. यावेळी शहरातून आणखी दोन तीन लोकही त्यात सहभागी झाले. चर्चेतील वातावरण विशेष उत्साहपूर्ण नव्हतं. मात्र सर्वांनी मिळून आपली भूमिका मांडणारे निवेदन स्थानिक प्रशासनाकडे सोपवण्याचा निर्णय घेण्यात आला.

आपल्या तरूण प्रश्नकर्त्याने आणि प्रौढ उत्तरदात्याने हे निवेदन तयार करण्यात महत्वाची भूमिका बजावली आणि काम हातावेगळे होताच पुन्हा चर्चेला सुरूवात केली. यावेळी तेथे उपस्थित असलेल्यांपैकी आणखी काहीजणही त्यात भाग घेण्यास पुढे सरसावले.

**प्रश्न :** दोन दिवसांपासून सुरू असलेल्या आपल्या चर्चेवर मी खूप विचार केला. माझ्या काही मित्रांशीही बोललो. आम्हाला एक प्रश्न पडला आहे की स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशातील अधिकाधिक जनतेमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याचा प्रयत्न आपलं सरकार सतत करतं आहे. तरीही, गेल्या साठ वर्षांत देशातील चाळीस टक्के जनताही सुशिक्षित झालेली नाही. आम्हाला वाटतं की ज्या त्रुटी राहिल्या आहेत त्या शिक्षणप्रसाराच्या प्रयत्नांमध्ये नव्हे, तर त्यासंबंधीच्या मूळ कल्पनेलाच तपासून पाहण्याची खरी गरज आहे. जर आपण लोकविद्यावंतानाही ज्ञानवंताचा दर्जा दिला आणि हे मान्य केलं की त्यांच्याजवळ एक वेगळ्या प्रकारचे ज्ञानभांडार आहे ज्यातून ते इतरांनाही ज्ञान देऊ शकतात, तर आपल्या देशातील सुशिक्षितांची संख्या शंभर टक्के असू शकेल. आणि त्यामुळे समाजमानात आत्मविश्वास वाढीला लागेल. मला तर या विचाराने अगदी भारून टाकलं आहे.

**उत्तर :** खरं आहे! खरं तर समाजाच्या एखाद्या वर्गाला दैन्यावस्थेतच राहू देणे आणि त्यांच्या दयनीय अवस्थेची त्यांना आणि इतरांना सतत



होते. लोकविद्येच्या दृष्टीने फक्त कलाकाराने दिव्य अनुभव घेणे पुरेसे नाही तर कलेचा रसग्रहण करणारे प्रेक्षक व श्रोतेही त्या आत्मानंदापर्यंत जाऊन पोहचणे आवश्यक असते. या कसोटीला उतरणारे कलादर्शन करू शकेल तोच कलाकार श्रेष्ठ गणल्या जातो. लोकविद्येचे हे अंतर्निहित तत्व केलेच्या सामाजिक जाणिवेला भक्कम आधार देते.

**प्रश्न :** तो कसा?

**उत्तर :** कारण मग कला हा केवळ खाजगी अनुभव उरत नाही. वैयक्तिक कौशल्याचे प्रदर्शन आणि अनुभवांचे सादरीकरण म्हणजे कला नव्हे, त्यातून मानवी मने आणि मानवी समाजामध्ये पूल उभा राहत नाही. तुम्ही पहाल की लोककलेत आजही त्याच्या उद्‌गात्याचे नाव दिले जात नाही, ती केवळ 'पारंपारिक कला' याच रूपात आपल्याला भेटते. कारण लोकविद्या कलेला 'वैयक्तिक गुण' मानित नाही व अशाप्रकारे अहंकाराची बीजे रोवण्यास लोकविद्येचा ठाम विरोध आहे. केवळ कलाक्षेत्रातच नव्हे तर वैद्यक व कृषिविद्या तसेच उद्योग व्यवसायाचे ज्ञान यातही हेच तत्व आढळते. लोकविद्येच्या दृष्टीने ज्ञानावर व्यक्तीचा नव्हे तर समाजाचा अधिकार असतो.

**प्रश्न :** मग भांडवलशाहीने ज्ञानाला खाजगी संपत्ती बनविले आहे का?

**उत्तर :** कदाचित! कारण या व्यवस्थेत खाजगी संपत्तीला मान्यता दिली जाते त्याचप्रमाणे ज्ञान अथवा माहितीचा एकाधिकारही मान्य केला जातो. विज्ञानाच्या आधारे लावलेल्या शोधांचे 'पेटंट घेणे' हे याचे उदाहरण आहे. उलट लोकविद्या मात्र ज्ञानाच्या खरेदी विक्रीचा सक्त विरोध करते. 'ज्ञान' ही समाजाची संपत्ती मानल्या गेल्यामुळे विद्येचा असा व्यापार करण्याचा नैतिक अधिकार लोकविद्या नाकारते. या उदात्त दृष्टीकोनामुळे ज्ञान ही कोणाची मक्तेदारी नसते तर समाजाच्या उत्कर्षाचे साधन ठरते. आजकाल शाळा–महाविद्यालये, इस्पितळे अथवा मनोरंजनाची ठिकाणे खाजगी मालकीची उद्योगकेंद्रे झालेली दिसतात. लोकविद्येला हे मान्य नाही, उलट हा पापमार्ग मानला जातो.

करण्याला महत्व नाही. तर लोकविद्या ही भाव–भावना, नैतिक मूल्ये आणि मानवी अथवा जैव संवेदना महत्वाची मानते, त्याला अनुभवाच्या आधारे अथवा रूपकातून मांडण्याला प्राधान्य देते. त्यामुळे हे अधिक उच्च श्रेणीचे ज्ञान मानले पाहिजे.

**प्रश्न :** लोकविद्येमध्ये कला कशी समजून घेता येईल?

**उत्तर :** मला वाटतं की लोकविद्येच्या दृष्टीने 'कला' हे 'सत्यनिर्मितीचे' माध्यम आहे. अर्थातच या मार्गाने जाणारा कलाकार स्वतःच्या उत्कर्षाबरोबर समाजाचा स्तर उंचावण्याचा राजरस्ता तयार करतो. अनैतिक, अमानवी वृत्तीवर मात करून 'सत्' प्रवृत्तीचा निर्माण आणि प्रसार हे त्याचे वैशिष्ट्य आहे. लोकविद्या ही कलेला केवळ पंचेंद्रियांना सुखविण्याचे साधन या संकुचित दृष्टीने पहात नाही तर 'सौंदर्य आणि सत्' यांचे निर्माण हा कलेचा गाभा मानला जातो.

**प्रश्न :** म्हणजे काय?

**उत्तर :** खरा कलावंत आपल्या कलेच्या अभ्यासादरम्यान किंवा निर्मितीच्या प्रक्रियेत विलक्षण अनुभव प्राप्त करतो. जाणकार लोक सांगतात की या प्रक्रियेत मनातील क्षुद्रता व हीण लोप पावते व मन आपोआप शुध्दतेने झळाळून उठते. तात्कालिक राग, लोभ, गर्व, वैर, व्देष या आणि अशा अहितकारी विचारांचा नाश होतो आणि मन निर्मळ होते. काहीवेळा ही अवस्था केवळ कलानिर्मितीच्या वेळाएवढी सीमित असू शकते, तरीही तिचे महत्व जाणले पाहिजे.

**प्रश्न :** हा तर अहंकारावर मात करण्याचा मार्ग आहे. तो सगळ्या कलांमध्ये शक्य आहे का?

**उत्तर :** निदान लोकविद्येत तरी तसेच मानले जाते. कलेत बाह्यरूप महत्वाचे मानले जाते खरे पण त्याहीपेक्षा कलासमाधीत रंगून जाण्याचे आणि त्यातून अलौकिक अनुभव प्राप्त करण्याचे महत्व जास्त आहे. म्हणूनच सामान्य मानसाच्या दैनंदिन जीवनातली कलेची गुंफण अलगद केली गेली. कारण कलाक्षेत्र हे सर्वसामान्यांच्या जीवनाला स्पर्श करणारे हवे



जाणीव करून देणे यामुळे ते आत्मविश्वास गमावून बसतात आणि त्यांचं शोषण करणं अधिक सोपं होतं. गरज असेल तेव्हा मदतीचा एखादा तुकडा त्यांचेकडे फेकून किंवा छोट्या छोट्या सवलती देऊन त्यांची मनं आपल्याकडे वळवून घेण्याचे कामही हेच शोषक करीत असतात.

**प्रश्न :** आम्हाला लोकविद्येच्या शक्तीविषयी आणखी माहिती मिळवावीशी वाटते आहे. त्याविषयी अनेक प्रश्नही आमच्या मनात आहेत. माझ्या मित्रांशी याविषयावर बोलल्यानंतर आम्ही एक प्रश्नावलीच तयार केली आहे म्हणाना! आणि हेच प्रश्न आम्ही तुम्हाला विचारु इच्छितो. आज त्याच प्रश्नांनी चर्चेची सुरूवात केली, तर चालेल का?

**उत्तर :** अवश्य! अगदी निःसंकोचपणे विचारा कदाचित काही प्रश्नांची उत्तरं मी देऊ शकणार नाही, पण निदान त्या प्रश्नांवर विचारमंथन होईल. हेही काही कमी नाही.

**प्रश्न :** आपल्या देशातील अधिकांश जनता अशा लोकविद्येची पाईक आहे. त्यांचे जात, धर्म, वेगवेगळे प्रांत यामुळे वेगवेगळे भाग झालेले आहेत, मग लोकविद्येला महत्व देण्यामुळे आपण त्यांच्या या भेदाभेदातच अडकून राहू अशी भीती नाही का? यामुळे उच्च नीच या भेदभावांना अधिकच बळकटी तर मिळणार नाही ना?

**उत्तर :** ही खरच महत्वाची गोष्ट आहे आणि त्याचा नीट विचार करणं आवश्यक आहे. मी या आधीही सांगितलं आहे की लोकविद्येला धर्म, पंथ, जात यांची कुंपणं नाहीत. थोडा विचार केला तर असं लक्षात येईल की एकाअर्थी लोकविद्या क्षेत्रसापेक्ष असते. भाषा जशी प्रांतवार बदलते पण धर्म, जात, पंथ यांच्या बंधनात अडकून पडत नाही तशीच लोकविद्याही आहे. मात्र या विद्येला जर आपण ज्ञानाऐवजी फक्त कौशल्याचं नाव दिलं, तर ती अपूर्ण किंवा संकुचित भासेल आणि मग ती तुम्ही म्हणता त्या बंधनात अडकून पडल्यासारखी वाटेल. मात्र हे लोकविद्येचे खरे स्वरूप नाही. या विद्येला जर तुम्ही 'ज्ञान' म्हणून मान्यता दिलीत तर

मात्र चित्र एकदमच बदललेलं दिसून येईल. तुम्ही कधी शेतकरी, कारागीर किंवा अगदी आदिवासींचं काम लक्षपूर्वक पाहिलत तर तुम्हाला कळेल ही लोकविद्याा म्हणजे फक्त काम करण्याचे कौशल्य नव्हे. तर तो एक असा ज्ञानाचा झरा आहे ज्याला तार्किक आधार आणि स्वयंभू तत्वं आहेत. थोडक्यात लोकविद्येत एक विशाल सामर्थ्य आणि अभिनव अशी वैश्विक दृष्टी आहे.

**प्रश्न :** हा मुद्दा अधिक विस्ताराने सांगाल तर बरं होईल.

**उत्तर :** एका प्रदेशातील लोक आपापसात एका विशिष्ट भाषेत संवाद साधतात. त्या भाषेत संवाद करतेवेळी जात, धर्म, पंथ यांचे अडसर त्यांना येत नाहीत. अगदी याच प्रमाणे लोकविद्येलाही हे सारे अडसर खीळ घालत नाहीत. कारण त्या त्या विशिष्ट प्रदेशातील सर्वांचे जीवन सहसा एकाच प्रकारच्या तार्किक आधारावर आणि तत्वांवर उभारलेले असते. त्यांना पायदळी तुडवून जगण्याची कल्पनाही त्यांना असह्य असते. यावरुन आपण असं निश्चितपणे म्हणू शकतो की जरी हे सर्व लोकविद्यावंत वेगळ्या जातिजमाती किंवा धर्माचे असले तरी त्यांच्यात अतिशय कणखर असा एकतेचा प्रवाह आहे. एकतेच्या या प्रवाहाचा उगम तर्क आणि तत्वांवर आधारलेल्या त्यांच्या ज्ञानभांडारातून झालेला आहे, त्यांच्या कौशल्यातून नव्हे.

**प्रश्न :** मग लोकविद्या ही प्रादेशिक बंधनात अडकून पडली आहे असं मानायचं का?

**उत्तर :** नाही, हेही खरे नाही. लोकविद्या ही स्थलकालानुरूप स्वतःला वेगवेगळ्या स्वरूपात प्रकट करत असते. पण तिची तत्वं आणि त्यामागील तर्कशास्त्र मात्र स्थलकालातीत आहेत. उदाहरणार्थ आपल्याकडची वऱ्हाडी लोकविद्या ही दूरच्या केरळ, कर्नाटक, किंवा ओरीसातील लोकविद्यपेक्षा वेगळी असू शकते, मात्र त्यातील तत्वं आणि तर्कशास्त्र मात्र समानच असतील. अगदी याचप्रमाणे आफ्रिका आणि रशियातील लोकविद्येचे दृष्य रूप वेगळे असेलही, मात्र त्यातील समानतेचा अंतःप्रवाह म्हणजे त्यातील



देशातील वेगवेगळ्या प्रातांत निरनिराळ्या संतानी जे अभंग–पदे रचली ती वेगवेगळ्या भाषांमध्ये असली तरी त्यात एकच सूत्र किंवा स्वर का आढळून येतो. ते सर्वच सांगतात की ईश्वर मनुष्याच्या मनातच वसत असतो, त्याला बाहेर शोधण्याची गरज नाही. आणि ते जेव्हा 'आपल्यातच देव आहे' म्हणतात तेव्हा ते कोणाच्याही खाजगी आयुष्याबद्दल बोलत नसतात, तर आपल्या दैनंदिन जीवनालाच गुंफल्या गेलेल्या अलौकिक तत्वांविषयी सांगत असतात. त्या सर्वांनी स्वतःच्या आयुष्यभर लोकविद्येची कास धरली आणि त्यालाच ईश्वरसेवा मानून ती श्रध्देने आचरली. पण म्हणजे प्रत्येक माणसाला ते ज्ञानसंपन्न मानत होते असे मला वाटते, माझे म्हणणे बरोबर आहे का?

**उत्तर :** अगदी बरोबर आहे. आणि लक्षात घ्या की केवळ 'ज्ञान' प्राप्त करणं आणि 'सृजन' करणं यात खूप फरक आहे. ज्ञान प्राप्त करणे म्हणजे फक्त पूर्वतयारी असणे. पण निर्मितीची कास धरणारा आणि सक्षम असलेला मनुष्य खरा विचारवंत असतो. माहिती गोळा करणे हे त्या तुलनेत निव्वळ कामगाराचे काम आहे. ते जरा अधिक नेटकेपणाने केले तर त्यांना समीक्षक म्हणू शकतो पण लोकविद्यावंत मात्र नवनिर्मितीची क्षमता असल्यामुळे खरे विचारवंत ठरतात. आजकालचे शाळा महाविद्यालयातील शिक्षण पुस्तकी ज्ञान देते आणि कामगार–मजूर तयार करते. पण समाजाला त्यांची गरज आहे की सृजनशील नवनिर्मात्यांची?

**प्रश्न :** तुम्ही हा फरक फार चांगल्या पध्दतीने सांगितला. कोणत्याही समाजाच्या उत्कर्षासाठी नवनिर्मात्यांची निश्चितच गरज असते. पण बाकीचे हे मान्य करतील का?

**उत्तर :** कलेच्या क्षेत्रात हे अधिक स्पष्टपणे दिसून येते. कलाकार आपल्या कलेच्या माध्यमातून नवनिर्मिती करतो म्हणजे एक प्रकारे नवे 'सत्य' जन्माला घालतो. हा कलाकार शाळा–महाविद्यालयांऐवजी इरतत्र अधिक चांगल्या प्रकारे तयार होतो. साहित्य, संगीत, नाट्यकला, चित्रकला, मूर्तिकला यात अशी अनेक उदाहरणे सापडतील. लोकविद्येत फक्त अनुकरणाला स्थान नाही किंवा निसर्ग अथवा समाजाचे नुसते चित्रण

**उत्तर :** त्याचे कारण असे की या दोन ज्ञानप्रवाहांमध्ये 'सत्य' ही कल्पना संपूर्णपणे वेगळ्या प्रकारे मांडली जाते त्याचा आपल्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनावर होणारा परिणाम आपण समजून घेतला पाहिजे.

**प्रश्न :** पण विज्ञानाधारीत तत्वे स्वीकारण्याचा एक दृश्य परिणाम तर आहेच. कारण यामुळे आपल्या समाजात 'स्वयंभू' असण्याऐवजी 'परजीवी' विचारवंताचा उदय झाला.

**उत्तर :** बरोबर आहे. ते सामान्य माणसाला अडाणी म्हणतात आणि या मताचा समाजात प्रसार करतात. शाळा–महाविद्यालयांतून विज्ञान शिकविले जाऊ लागले आणि सामान्य माणसाच्या कपाळी अडाणीपणाचा शिक्का बसला. त्यामुळे समाजात तट पडले. अन्न–वस्त्र–निवारा या दैनंदिन गरजा पुरविणारे लोक एका झटक्यात अशिक्षित ठरले आणि राज्यकर्त्यांनाही 'विज्ञानवादी' गटाचे समर्थन करण्याचा मार्ग अनुसरला.

**प्रश्न :** म्हणजे लोकविद्येचे अनुयायी आर्थिक, सामाजिक क्षेत्रात उपरे ठरलेच, शिवाय सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांची मुस्कटदाबी झाली आणि ढोबळमानाने त्यांना अडाणी ठरवून 'विज्ञानवादाने' त्यांचेवर आघाडी घेतली.

**उत्तर :** या लोकविद्यावंतापुढे केवढे मोठे आव्हान उभे आहे हे आता तुम्हाला कळेल. लोकविद्येमध्ये केवळ 'ज्ञान' पुरेसे नाही तर ते नैतिकतेच्या कसोटीवर उतरावे लागते. याउलट विज्ञान ज्ञान आणि नैतिकता या दोन वेगळ्या कल्पना मानते. जणू नैतिकतेचे जोखड झुगारूनच ते ज्ञानाच्या शोधात निघतात. त्यामुळे विज्ञानवादी समाजामध्ये मानवी भावना, सह्रदयता, मानवी सृजनशक्ती दुय्यम मानली जाते आणि विज्ञानाची तत्वे ते मानवी अस्तित्वापेक्षा स्वतंत्र ठेवतात. माणसाला नियंत्रित करण्याची गरज भासली तर ते आणखी दुसऱ्या, बाहेरच्या व्यवस्थेचा आधार घेतात. लोकविद्या मात्र मानवी संवेदनांशी निगडीत असल्यामुळे ती स्वशासन, संयम, स्वदेशी, सत्याग्रह, यांच्या भक्कम पायावर उभी राहते आणि मानवी इच्छा आकाक्षांच्या स्वनियंत्रणावर भर देते.

**प्रश्न :** दोन्हीमध्ये फारच फरक आहे. आता मला जाणवतं आहे की आपल्या



समान तत्वं आणि तर्कशास्त्र! थोडक्यात वेगवेगळ्या प्रदेशातील वरवर वेगळी वाटणारी लोकविद्या शेवटी अशाप्रकारे समानच आहे.

**प्रश्न :** ती कशी?

**उत्तर :** वेगवेगळ्या भागांतील लोकविद्यावंतामध्ये जे नातं लोकविद्येच्या माध्यमातून निर्माण होतं तसाच ऋजु संबंध लोकविद्येमुळे वेगवेगळ्या प्रांतातही निर्माण होतो.

**प्रश्न :** हे संबंध नेमके कसे असतात?

**उत्तर :** परस्परांविषयी प्रेमादराचे हे सौहार्दपूर्ण संबंध असतात. विद्या वेगवेगळ्या असल्या तरी त्यांत एकमेकांशी मैत्रीचे संबंध असतात. त्या सर्वांसाठी लोकाभिमुख होऊन मान्यता प्राप्त करण्याची परीक्षा अपरिहार्य असली तरी त्यांच्यात एकमेकांना विकसित करण्याची उदार दृष्टीही आहे. याच भक्कम पायावर लोकविद्या वेगवेगळ्या नातेसंबंधांची निर्मिती आणि विकास करत असते.

**प्रश्न :** आताच तुम्ही सांगितलं त्या कौशल्य, तर्कशास्त्र आणि तत्वं या संकल्पना आणखी स्पष्ट केल्यात तर बरं होईल.

**उत्तर :** मी विस्ताराने समजावून सांगतो. मात्र ते नीट समजून घेण्यासाठी तुम्हाला धीर धरावा लागेल.

**प्रश्न :** अवश्य. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे पूर्ण वेळ देऊन त्या जाणून घेण आम्हालाही आवडेल.

**उत्तर :** सर्व प्रथम आपण लोकविद्येच्या तर्कशास्त्राचा विचार करू. महाविद्यालयांतून शिकविल्या जाणाऱ्या तर्कशास्त्रापेक्षा हे तर्कशास्त्र वेगळे आहे. पाश्चिमात्य देशांत तर्क बरोबर आहे किंवा नाही हे ठरविण्याचे निकष वेगळे असतात. त्या तर्कांचे सत्याशी, ज्ञानाशी अथवा समाजाशी काही नाते आहे की नाही या गोष्टीला महत्व नसते. त्या त्या वस्तूचे घटक आणि त्याची घडण, दर्जा यालाच फार महत्व दिले जाते. मात्र लोकविद्येची परिस्थिती

सर्वथा वेगळी आहे. लोकविद्या नेहमीच सामाजिक मूल्यं, प्रेरणास्थाने, आपली उद्दिष्टे व त्या समाजाच्या गरजांचे भान ठेवते. थोडक्यात लोकविद्येमागील तर्क लोकसम्मत असेल तरच ग्राह्य धरला जातो. यालाच सत्य–सापेक्ष म्हटले जाऊ शकते. आपल्या आजूबाजूला लोकविद्यावंताच्या कार्यावरून या विधानाची सत्यता पडताळून पाहता येईल.

एखाद्या शेतकऱ्याला त्याच्या शेतातील मातीविषयी विचारले तर तो सांगू शकेल की त्यात किती पाणी जिरते, ती कोणत्या पिकांसाठी योग्य आहे, कोणत्या प्रकारचे खत त्या मातीसाठी आवश्यक आहे, मातीतील जीवाणूंवर त्याचा काय परिणाम होईल. मानवाला त्यापासून तात्कालिक आणि दूरगामी असे कोणकोणते फायदे–तोटे होऊ शकतील वगैरे. मात्र आपल्या शेतीविषयी त्याचे ज्ञान आणि त्यासंबंधीचे त्याचे तर्कशास्त्र वरवरचे किंवा उथळ नसून, गतिशील, अर्थात गरजेनुरूप बदलणारे असते. वातावरण, ऋतु, साधनांची उपलब्धता, मातीत वेगवेगळ्या कारणांनी घडून येणारे बदल किंवा बाजारात मागणी पुरवठ्याची बदललेली परीस्थिती या अनुषंगाने तो शेतकरी आपली पिके, मशागतीची पध्दत आणि एकूणच कार्यपध्दतीत आवश्यक बदल करतो. एवढच नव्हे तर आपल्या कामामुळे निसर्गावर आणि समाजावर होणाऱ्या परिणामांनाही त्याच्या लेखी फार महत्व असते आणि नकारात्मकतेचा संकेत मिळताच तो तत्काळ स्वतःच्या विद्येला आवश्यक ते वळण देऊन समतोल साधतो. याचप्रमाणे जर तुम्ही आदिवासींना जंगलातील वृक्ष–लता, नदी, पहाड आणि वन्यजीवांविषयी विचाराल तरी तुम्हाला आढळून येईल की त्याच्या ज्ञानाला सकारात्मक परिणाम आहे. स्वतः कडील ज्ञानाचे वर्णन कुठलाही आदिवासी त्या ज्ञानाच्या लोकहितकारी गुणांपासून करतो. सोबतच त्यामुळे निसर्गाशी संबंध दृढ कसे होतात हे सांगतो. निसर्गापासून मानवाला मिळणारे लाभ आणि निसर्गाच्या संरक्षणाची गरज आणि त्याची पध्दती हा आदिवासींच्या विचारसरणीचा पाया आहे. कारागीरांच्या कार्यपध्दतीतही लोकविद्येच्या याच पैलूचा पडताळा येईल. थोडक्यात असे म्हणता येईल की लोकविद्या ही एका अर्थी सजीव व गतिमान असे शास्त्र आहे.



दिला. हे नीटप्रकारे समजून घेतले तर लोकविद्येच्या शक्तीविषयी अधिक काही सांगण्याची आवश्यकता ऊरणार नाही.

**प्रश्न :** तुम्ही म्हणताहात ते बरोबर आहे, पण आपल्या परंपरेकडे या दृष्टीने कधी कोणी पाहिलच नाही. आपली कर्मकांडे, अंधविश्वास, धार्मिक अवडंबर यामुळे वेळोवेळी आपली झालेली हानी तेवढी दरवेळी बटबटीतपणे मांडली जाते पण त्याचवेळी या परंपरेची उज्वल बाजू मात्र जाणूनबजून झाकून ठेवली जाते. पण, तुम्ही म्हणालात की विज्ञान आणि लोकविद्या या दोन्हीमध्ये 'सत्य' ही संकल्पनाच वेगळ्या प्रकारे ग्राह्य धरतात, त्यामुळे खूपच फरक पडतो, ते कसे काय?

**उत्तर :** कारण लोकविद्येमध्ये 'सत्य' या नावाचा काही वेगळा घटक अस्तित्वात नाही, तो बाहेरून कुठून आणावा लागत नाही तर लोकविद्येचे पाईक त्यांच्या रोजच्या आयुष्यातच सत्याची उपासना आणि संवर्धन करीत असतात. थोडक्यात लोकविद्येतील सत्य हे सामान्यातील सामान्य व्यक्तीसाठीही सहजप्राप्य आहे. एवढेच नव्हे तर त्यांच्यामार्फत सत्याचा प्रसार आणि पुनर्निर्मिती लोकविद्येत सहज शक्य आहे. याउलट विज्ञानाची स्थिती आहे. विज्ञानातील तत्वे अथवा शोध यासाठी विशिष्ट परिस्थितीची गरज भासते. अनेकदा तर नैसर्गिक अथवा सामाजिक धडणीपेक्षा वेगळ्या वातावरणातच ती सिध्द होतात आणि त्यासाठी विशेष प्रकारचे शिक्षण घेतलेल्या व्यक्तींची गरज असते. त्यामुळे विज्ञानातील सत्य सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर जाते. म्हणजेच विज्ञानमार्गाने जायचे ठरविले तर सामान्य माणसाला स्वतःच्या प्रगतीसाठी पूर्णतः दुसऱ्यावर अवलंबून रहावे लागते त्यामुळे स्वतःच्या उत्कर्षासाठीसुध्दा तो परावलंबी होऊन बसतो आणि तरीही विज्ञानवादच प्रबळ होत राहिल्यामुळे आर्थिक, राजनैतिक, प्रशासनिक या क्षेत्रात तसेच आरोग्य, शिक्षण यातही ह्याचे दुष्परीणाम आपल्याला सहन करावे लागले.

**प्रश्न :** पण आपली प्रगति आपण स्वतःच करुन घेण्याऐवजी ती अन्य कोणाच्या मर्जीवर अवलंबून असावी हा तर आपल्याविरुध्दचा मोठा कटच म्हणावा लागेल.

होण्याची भीती दाखवूनच तिच्या संगणकीकरणाच्या बेताला मान्यता मिळवली गेली.

**प्रश्न :** आम्हाला लोकविद्येच्या शक्तीची सांस्कृतिक बाजू कशी समजेल?

**उत्तर :** आपल्याला सगळ्यांनाच हे समजावून घेतलं पाहिजे. आपण आताच त्याची सुरूवात करूया. खरी गोष्ट अशी आहे की लोकविद्येत 'सत्य' ही शाश्वत गोष्ट मानली गेली आहे. सत्याची निर्मिती व त्या निर्मितीची अखंड प्रक्रिया लोकविद्येत महत्वाची मानली जाते. विज्ञानात सत्याचा शोध महत्वाचा मानला जातो. मात्र सत्याचे निर्माण त्यांना अभिप्रेत नाही. या एकाच गोष्टीमुळे खूप फरक पडतो.

**प्रश्न :** ही गोष्ट जरा फोड करून सांगाल तर बरे होईल.

**उत्तर :** लोकविद्येत सत्याचे वेगळे अस्तित्व नाही कारण सत्य हे लोकांच्या जीवनाचा अविभाज्य भागच आहे. वेगळे काढून दाखविता येईल अशी ती काही वस्तू नाही. म्हणून लोकविद्येत चमत्कार वगैरे नसतात. सत्य म्हणजे अप्राप्य, दुर्मिळ अशी गोष्ट ते मानतच नाहीत त्यामुळे त्याचा शोध घेण्याचा प्रश्नही उद्भवत नाही. लोकविद्येचे सत्य सामान्य लोकांच्या जीवनाचे अविभाज्य अंग आहे. आवश्यकता, अनुभव आणि सहृदयता या त्रिसूत्रीतून सत्य निर्माण होते आणि लोकविद्येत ते वेळोवेळी दृग्गोचर होते आणि सर्वसंमतीने आणि सर्वांच्यातच हे तत्व भिनले असल्याने सत्याची निर्मिती कधीच थांबत नाही.

**प्रश्न :** पण हे सिध्द कसे करणार ?

**उत्तर :** आपली परंपरा ही मुळातच लोकविद्येची परंपरा आहे. आपल्या देशातील सर्व संतांनी सततच सांगितले आहे की आपल्या सर्वांच्या दैनंदिन जीवनात सत् अर्थात सत्य आणि ईश्वराचा वास असतो. थेट भगवान बुध्द, कबीर, नामदेव, तुकाराम, रैदास, मीरेपासून ते आधुनिक काळातील महात्मा गांधीपर्यंत सगळ्यांनी वेळोवेळी हे आपल्या लक्षात आणून दिले आहे. या सर्वांनी लोकविद्येला पुनर्जीवन देण्याचे प्रयत्न तर केलेच. पण त्याचबरोबर शक्तीशाली अन्यायी राज्यकर्त्यांबरोबर जनतेला सोबतीला घेऊन लढा



कोणत्याही कृतीसंदर्भात तिचा अन्य सर्वांवर होणारा परिणाम लोकविद्येत महत्वाचा मानला जातो, हा परिणाम सकारात्मक असावा आणि त्यामुळे सामाजिक मूल्यांना बळकटी यावी, व यातून लोकहित साधले जावे याकडे लोकविद्येचा कल असतो. विशेष म्हणजे लोकविद्येमागील हे तर्कशास्त्र सर्व धर्म, जाती अथवा संप्रदायाची लोकविद्यावंतानी मान्य केलेल दिसून येतं.

**प्रश्न :** ही मांडणी जरा नवीन आणि महत्वाची आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना हवा किंवा पाणी म्हणजे काय असे विचारले की ते लगेच त्याच्या घटकांची नावे सांगतात, जसे ऑक्सीजन, हायड्रोजन वगैरे आणि त्यांचे हवेतील आणि पाण्यातील प्रमाण इ. माहितीही ते देऊ शकतात. थोडक्यात त्या त्या गोष्टीचे भौतिक मापन व त्या संदर्भात त्याच्या वैशिष्ट्यांचे परीक्षण करण्याची त्यांची पध्दत असते. याउलट लोकविद्येमध्ये त्या वस्तूंचा इतर सर्वांवर होणारा परिणाम हाच गाभा मानला जातो. लोकविद्या लोकहितालाच सर्वात महत्वाचे मानत आल्यामुळे तिचा दृष्टिकोन अगदी भिन्न दिसून येतो. खरं तर लोकविद्येत नेहमीच लोकहिताच्या तर्कावरच ज्ञानाची उभारणी आणि विस्तार केला जातो हीच फार महत्वाची बाब आहे. तुम्ही नेहमी लोकविद्येला प्रगत ज्ञान का म्हणता ते आता थोडं थोडं कळल्यासारखं वाटतं आहे. आणि आता मला लोकविद्येची तत्वं आणि कौशल्य याविषयी माहिती करून घ्यायची आहे.

**उत्तर :** तुम्ही या सर्व सगळ्या गोष्टी खूपच लवकर समजून घेता आहात. तुम्हाला सांगतो की लोकविद्या ही तर्कशास्त्र, तत्व आणि कौशल्य या तिपेडी गुंफणीतून विस्तारली आहे आणि ही गुंफण इतकी घट्ट आणि तर्कसंगत आहे की त्यांना विलग केले तर लोकविद्येचा आत्माच नष्ट होईल. आजकाल या लोकविद्यावंताचे कौशल्य वापरून त्यांची उत्पादनक्षमता, दर्जा आणि त्या वस्तूंचा उपयोग वाढवण्याचा प्रयत्न सुरू आहे आणि काहीवेळी त्यांना यश मिळालेले दिसलेही. मात्र नंतर हेच यशस्वी लोक तक्रार करतात की आमचे उपाय हे पारंपारिक लोकविद्यावंत वापरतच नाहीत. मात्र त्यांच्या या अशा 'नकारा'मागे त्यांची पारंपारिक

ज्ञानाधारित कारणे असतील याचा विचार ते करतच नाहीत. त्यांना हे कौशल्य म्हणजे श्रमाचाच प्रकार वाटतो. वास्तविक त्यांचे कौशल्य ही ज्ञानाधारित क्रिया आहे हे त्यांना कळतच नाही.

**प्रश्न :** याचा अर्थ असा की लोकविद्येत श्रम आणि विद्या यांचा संगम झालेला आहे आणि श्रमाचे काम व बुध्दीचे काम वेगळे असेल असे लोकविद्या मानत नाही, असाच ना?

**उत्तर :** हो! अशाप्रकारे श्रम आणि बुध्दीची ताटातूट करणे हे भांडवलशही व्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे. उलट लोकविद्येत तर सर्वच कार्यात ज्ञानाची आवश्यकता असल्याने सर्वजण ज्ञानवंतच मानले जातात.

भांडवलशाही व्यवस्थेत कारखान्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वस्तूंच्या उत्पादनाची सुरूवात झाली आणि श्रमाची कामे करणाऱ्यांना मजूर हे नाव मिळाले. म्हणजे ज्ञान आणि बुध्दीची फारकत केली गेली. आपण आता त्याच भांडवलशाही समाजरचनेचा अंगिकार केल्यामुळे त्यांच्याच दृष्टीकोनातून जग बघतो आणि श्रमाचे काम करणाऱ्याला 'मजूर' असेच संबोधतो. अशा सरळधोपट पण चुकीच्या धोरणामुळे ज्ञानसंपन्न असा लोकविद्येचा जो पाईक तोही आपल्या लेखी 'मजूर'च ठरतो.

**प्रश्न :** लोकविद्येची तुम्ही करून दिलेली ओळख खरच अद्भुत आहे. आता आम्हाला कळतय की ज्यांना आपण सरळसरळ अडाणी, अशिक्षित, खेडवळ, मजूर म्हणतो त्यांना ही लोकविद्येची कल्पना कळली तर त्यांच्यात आत्मविश्वास जागृत होईल आणि इतक्या मोठ्या प्रमाणात ज्ञानवंताची ओळख पटल्यामुळे समाजातही चैतन्याचा संचार होईल. नाहीतर आजकालच्या शिक्षणपध्दतीत किंवा राजकारणातही यांना 'मुळी बिचारी, कुणीही हाका' अशीच वागणूक दिली जाते. पण आता लोकविद्येच्या आधारे हा असा अपमान नाकारुन स्वत्वाची भावना त्यांच्यात जागृत केली जाऊ शकेल. तुम्ही खरच याविषयी अजून माहिती द्या. मला तर अधिकाधिक जाणून घेण्याची फारच इच्छा होते आहे.



# ७ दर्शन

वर्धा तालुक्यातील काही गावात शेतकऱ्यांनी "रस्ता रोकोचे" आंदोलन सुरू केले होते. हे आंदोलक तालुक्यातील मुख्य रस्त्यावर ठाण मांडून बसले होते. त्यामुळे वाहतूक खोळंबली होती. शेतकऱ्यांच्या मुख्य मागण्या होत्या की शेतमालाला योग्य भाव मिळाला पाहिजे.

आपले प्रश्नकर्ता आणि उत्तरदाता या शेतकऱ्यांच्यात जाऊन बसले. शेतकरी एकामागून एक अशाप्रकारे आपले म्हणणे मांडीत होते. एका शेतकऱ्याने तेवढ्यात एक लोकगीत म्हटले. आपल्या रांगड्यापण सुरेल गाण्यातून त्याने शेतकऱ्यांच्या व्यथांना वाट करून दिली. इथे लाऊडस्पीकरही नाही, पण त्याने अगदी खड्या आवाजात हे गाणे म्हटले. आपल्या साध्या गावरान शब्द आणि सुरातून त्याने आपल्या परिस्थितीचे चित्रच रेखाटले जणू किती सामर्थ्यशाली आहे ही लोककला !

**प्रश्न :** आपल्या गावागावातून अगदी जंगलातही कलेची अशी विविध रूपे दिसून येतात. पण आपल्या मागील भेटीत तुम्ही सांगितल त्यावरून मला असं वाटत की या साऱ्या कला समाजापासून हिरावून घेतल्या जातील आणि त्यांचा बाजार मांडला जाईल.

**उत्तर :** अशी भीती वाटण्याजोगी परिस्थिती आहे खरी, पण एक लक्षात ठेवा की लोकविद्या काही काळापुरती मागे हटेल, दडपली जाईल पण संपूर्णपणे नष्ट मात्र होणार नाही आणि आपल्या लोकविद्यावंतानी मनात आणलं तर ते या राक्षसी आक्रमणाला पुरून उरतील उलट, वरचढही ठरतील. आज आपण लोकविद्येच्या सांस्कृतिक शक्तीचा विचार करूया, लोकविद्या दर्शन ही कल्पना समजून घेऊया.

**प्रश्न :** आम्हाला आवडेल हे ऐकायला.

**उत्तर :** लोकविद्या नष्ट होण्याची भीती अनाठायी आहे. लोकविद्या कधीच मरण पावणार नाही. ती नवनव्या रूपाने प्रकट होईल. तरीही ही विद्या नष्ट

अस्तित्वात येत आहे. आधी त्यांच्याकडे दुर्लक्ष करायचे आणि नंतर त्यांच्या केविलवाण्या परिस्थितीत त्यांचे ज्ञान वापरण्याचा त्यांचा अधिकार त्यांच्यापासून हिरावून घ्यायचा. शेतकरी, कारागीर, आदिवासी आणि छोट्या दुकानदारांच्या व्यथेचे कारण यातच आहे.

**प्रश्न :** म्हणजे लोकविद्येला उद्योगाच्या स्वरूपात परिवर्तित करून नफाखोरी करण्याची या माहिती युगाची युक्ती आहे. हे तर कपट आहे. तुम्ही जी ज्ञानाच्या शोषणाची गोष्ट सांगत होतात, ती मला आता समजते आहे.

**उत्तर :** हे फक्त कपट नाही, तर अतिशय क्रूर असे कार्य आहे. लोकविद्येतील मूल्यांना नष्ट करून त्यापासून नफेखोरी करणे हा निसर्ग आणि मनुष्याच्या प्रति केला गेलेला जघन्य अपराध आहे. म्हणूनच या तंत्रज्ञानापासून अतिशय सावध राहण्याची गरज आहे.

**प्रश्न :** तुम्ही सांगितलेल्या गोष्टींमुळे जणू आजवर बंद असलेल्या मेंदूच्या खिडक्या उघडल्या जात आहेत. लोकविद्येच्या सामाजिक आणि आर्थिक शक्तीचा परिचय अचंभित करणारा आहे. लोकविद्येस पुनः प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी उचलल्या जात असलेल्या पावलांबद्दल जाणून घेण्यास मी उत्सुक आहे आणि तव्दतच माहिती तंत्रज्ञानासोबत लोकविद्येचा दृष्टिकोन कसा असावा, हे ही जाणून घ्यायला मला आवडेल.

**उत्तर :** आज तर आता पुष्कळ उशीर झाला आहे. जेवणाची वेळ होते आहे. जेवणानंतर सगळे आपआपल्या घरी जातील. परवा वर्ध्याला धरणे देण्याचा शेतकऱ्यांचा विचार आहे. तुम्ही हवं तर तेव्हा येऊन जा.

●●●



**उत्तर :** असं पहा की लोकविद्येचे काही ग्रंथ किंवा शास्त्र नाहीत की ते वाचून कोणीही लोकविद्येवर प्रभुत्व मिळवेल किंवा लोकविद्येचा पंडित होईल. सामान्य लोकांच्या दैनंदिन जीवनातच लोकविद्येचा वास असतो त्यामुळे त्यांचे जीवन समजून घेतले तर लोकविद्येचाही अर्थ कळत जातो. लोकविद्येची हीच गुरूकिल्ली आहे कारण जीवनाप्रमाणेच लोकविद्याही गतिशील आहे.

**प्रश्न :** आपल्या देशातील शिक्षणपध्दतीमध्ये शेतकरी, कारागीर किंवा आदिवासींच्या कामाकडे कधीच 'ज्ञान' या दृष्टीने पाहिले जात नाही. प्राचीन ग्रंथातून लिहून ठेवले तेच ज्ञान असे म्हणूनच आम्हाला आपल्या परंपराची माहिती दिली जाते. वास्तविक आपल्या शिक्षणात एवढ्या मोठ्या ज्ञानभांडाराचा समावेश नसावा हे तर दुर्दैवच म्हटले पाहिजे.

**उत्तर :** खरं आहे. शाळा महाविद्यालयांमध्ये परंपरा म्हणजे आपले जुने ग्रंथ एवढच शिकवतात आणि त्यातून उभे राहणारे चित्र म्हणजेच आपला समाज अशी आपली समजून होऊन बसते. खरं तर लोकविद्येच्या दृष्टीकोनातून पाहिले तर फक्त आपले ग्रंथ, व्रतवैकल्ये, समाजातातील व्यवहार म्हणजेच परंपरा नव्हे. या सर्व गोष्टी तर आपल्या परंपरेचा एक छोटासा भाग आहेत, आणि खरे तर कालबाह्य अशा अनेक गोष्टीचा भरणा त्यात आढळतो. या उलट लोकविद्येत आपल्या जीवनाशी निगडीत असे ज्ञान आहे आणि कालानुरून आवश्यक बदल व सुधारणा करत गेल्याने तिच्यात रसरशीतपणा आहे. निरूपयोगी संकल्पना टाकून देऊन आवश्यकतेप्रमाणे नव्या कल्पनांचा समावेश करत गेल्यामुळे लोकविद्येत चैतन्य आढळून येते.

**प्रश्न :** मी नेहमीच लोकविद्येचा विचार कमीपणाच्या भावनेतूनच केला. 'पुराणातली वानगी पुराणात' या न्यायाने ती एक जुनाट आणि रूढीवादी गोष्ट आहे असेच मला वाटायचे याची मला आता लाज वाटते. पण, तरीही मला वाटतं की माझ्या मनातल्या शंका अजूनही पूर्ण गेलेल्या नाहीत. मी त्यासाठी पुन्हा केव्हा भेटू?

**उत्तर :** मला वाटतं की आपल्या आतापर्यंतच्या चर्चेतील बाबींवर चिंतन आवश्यक आहे. आणि माझ्यापेक्षाही आपल्या लोकविद्यावंतना भेटून, प्रत्यक्ष त्यांच्याकडून काही गोष्टी जाणून घेतल्या तर जास्त बरे होईल. शिवाय या आठवड्यात मला घरीच काही काम आहे. त्यामुळे भेटणं जमणारही नाही. पण हो, पुढल्या शुक्रवारी स्टेशनजवळ फेरीवाले जमणार आहेत कारण त्यांची तिथली जागा हिरावून घेतली आहे. त्यांच्याशी बोलायला मी जाणारच आहे तेव्हा तुम्ही येऊ शकता.

**प्रश्न :** नक्की, मी माझ्या काही मित्रांनाही बरोबर आणेन.

**उत्तर :** या! आम्हाला आनंदच होईल.

●●●



पध्दतीने बनले असो, म्हणजे लोकविद्येच्या आधारावर किंवा विज्ञानाच्या आधारावर बाजारामध्ये त्याचे बरोबरीने महत्व आहे. म्हणून हा काळ लोकविद्येसाठी ऐतिहासिक महत्वाचा काळ आहे. याच काळामध्ये तिला आपली प्रतिष्ठा प्राप्त करण्यासाठी अनुकूल कार्य करण्याची गरज आहे. दुसरी गोष्ट म्हणजे औद्योगिक युगातील समाजाने लोकविद्यावंत समाजातील वेगवेगळ्या घटकांना उध्वस्त केले होते, ते सगळे लोकविद्यावंत एकाच प्रकारच्या लुटीचे बळी झाले आहेत, ती म्हणजे यांचे श्रम आणि ज्ञान यांची लूट. ही लूट यांच्यामध्ये सम–दुःखं आणि एकीचा बंधुभाव निर्माण करताना दिसत आहे. एवढंच नव्हे तर यांच्यामध्ये ज्यादिवशी चेतनेचे स्फुल्लिंग पेटेल, त्यादिवशी शेतकरी, कारागीर, आदिवासी, छोटे दुकानदार हे सारे मिळून एका ज्ञानाधारित समाजाचे निर्माण करतील आणि त्याच दिवशी भांडवलशाहीवर आधारित माणुसकीचा अभाव असलेल्या व्यवस्था कोसळायला सुरूवात होईल.

**प्रश्न :** हो, लोकविद्येमध्ये या चेतनेचे विचार जागृत दिसतात. परंतु एक सांगा, की तुम्ही या आधीच्या वार्तालापात माहिती तंत्रज्ञानासंबंधी सावधगिरीची सूचना दिली होती, त्याचा येथे काय संबंध आहे?

**उत्तर :** जागतिकीकरण माहिती तंत्रज्ञानाच्या आधारावरच सुरू आहे. या तंत्रज्ञानाचा विकासच मुळी ह्याच उद्देशाने झाला आहे. मागील काही वर्षापासून या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने जगाच्या कानाकोपऱ्यातून लोकविद्येचे संकलन केले जात आहे. जगातील प्रत्येक समाजाची लोकगीतं, लोककला, लोकशिल्प, लोकस्वास्थ्य, लोककथा आणि लोकजीवनातील प्रत्येक पदराचे ज्ञान संकलित करून कम्प्यूटरमध्ये सुरक्षित जाम करून ठेवण्याचे काम चालू आहे. ह्याचेच आता एका मोठ्या उद्योगाच्या स्वरूपात रुपांतर झाले आहे. ज्ञान संकलन करण्याच्या या कामात ज्ञानाची खरेदी–विक्री पण चालते परंतु यातील नफा लोकविद्यावंतांना मिळत नसून ज्या संस्थाव्दारे संकलन केले जाते, त्यांना मिळतो. ह्या संकलनाला पेटंट मिळवून देण्याचे पण घाटत आहे. यामुळे या ज्ञानावर लोकविद्यावंतांचा नाही, तर संस्थांचा अधिकार राहील. लोकविद्यावंतांच्या ज्ञानाच्या लुटीचे हे नवे तंत्र

प्रकाराने झाले तरी त्याची विक्री बाजारातच होणार, हे ओळखून प्रत्येक विक्री मागे आपला हिस्सा राखून ठेवण्याची व्यवस्था भांडवलशहांनी केली. या संपूर्ण प्रक्रियेला जागतिकीकरण म्हणून संबोधले गेले. औद्योगिक युगामध्ये वसाहत वादाला खतपाणी घालण्यात ज्याप्रमाणे यंत्र तंत्रज्ञानाचे सहाय्य झाले, त्याचप्रमाणे जागतिकीकरणाला मजबूत करण्यात माहिती तंत्रज्ञानाचे सहाय्य होत आहे.

**प्रश्न :** खरेच, अतिशय वेगाने या घटना घडताहेत. मागच्या केवळ 20 वर्षांमध्ये हे बदल झाले, परंतु ते इतक्या सहज प्रकारे आज मला समजले. परंतु तुम्ही ऐतिहासिक संधीची गोष्ट करीत होता, ती कोणती आहे?

**उत्तर :** मी हे सांगत होतो की जागतिकीकरणामध्ये उत्पादन कशा प्रकारे बनते याला अजिबात महत्व नाही. प्रयोगशाळा, कारखाने किंवा आदिवासी/कारागीरांची मंडई, कुठेही, कोणत्याही ज्ञानाच्या आधारावर बनले गेले तरी, उत्पादन हे बाजारात आले पाहिजे यावर जागतिकीकरणाचा कटाक्ष आहे. हेच कारण आहे की आज कोणतीही क्रिया किंवा कोणताही विचार याला वस्तुरूप देऊन विक्री योग्य स्वरूप देण्याला प्रोत्साहन दिले जात आहे. जागतिकीकरणामध्ये पैसा हा बाजारातून उचलला जातो, उत्पादनाच्या स्थानावरून नाही. यामुळे जगभरातील बाजारांची नव्या दमाने पुर्नबांधणी केली जाते आहे. त्याच पुर्नबांधणीमध्ये बाजारातील छोट्या छोट्या भांडवलाचे उद्योग मागे पडून मोठमोठ्या कंपन्यांचे मॉल वजा बाजार उभे राहत आहेत. नव्या बदलांचे हे एक लक्षण आहे. याला समजून घेण्याची गरज आहे.

**प्रश्न :** हे बरोबर आहे पण यामुळे काय झाले आहे?

**उत्तर :** यामुळे दोन गोष्टी झाल्या आहेत. एक म्हणजे उत्पादनाच्या निरनिराळ्या टप्प्यांमध्ये जरूरी असणाऱ्या ज्ञानाचे महत्व कमी झाले आहे, ज्यामुळे आपसूकच विज्ञानाचेही महत्व कमी झाले आहे. उत्पादन कशाही



# ४ लोकविद्याकरण

शुक्रवारची संध्याकाळ! शहरातील स्टेशनवर ही गर्दी आणि गोंगाट! बस, ट्रक, ऑटो सारे सुसाट वेगाने धूळ उडवीत धावत असलेले! सायकल, स्कूटरवालेही गर्दीमध्ये वेडेवाकडे धावत होते. लोकांना घरी जाण्याची घाई झाली होती. या साऱ्या धावपळीत रस्त्याच्या कडेला एका बंद दुकानाच्या पायऱ्यांवर काही लोक बसले आहेत. त्यांच्यात आपले प्रश्नकर्ता आपल्या दोन मित्रांसह उत्तरदात्यासोबत बसले आहेत. एक–एक करून लोकं येत होते. बैठक संपेपर्यंत जवळपास 70–80 लोक जमले होते. दुकानदारांनी आपली कैफियत मांडली. स्टेशनच्या आणि रस्त्याच्या सौंदर्यीकरणामधे त्यांचा धंदा कसा बंद पडला. कोणत्याही तक्रारीची दखल प्रशासनाकडून घेतली जात नाही आणि राजकीय पक्ष कसे मौन आहेत, अशा बिकट परिस्थितीतून मार्ग कसा काढणार? काही लोकांची जोशपूर्ण भाषणे झालित. शेवटपर्यंत लढण्याच्या गोष्टी बोलल्या गेल्या. बैठक समाप्तीपर्यंत एक प्रतिनिधी मंडळाची निवड करण्याची गोष्ट करणे एक मागणीपत्र प्रशासनाला सादर करतील असे ठरले. बैठकीच्या बरखास्तीनंतर आपले प्रश्नकर्ता आणि उत्तरदाता यांची चर्चा पुढे सुरू झाली.

**प्रश्न :** किती कठीण परिस्थिती आहे या लोकांची! कसे हे लोक तिचा सामना करतील, कुठे जातील?

**उत्तर :** इथे तर एका वेगळ्याच जगाची निर्मिती होते आहे जिची किंमत हे लोक ही चुकवीत आहेत.

........................ बऱ्याच वेळ शांती राहिली........................

**प्रश्न :** पण हा तर अन्याय आहे। (उत्तरदात्याने स्वीकृती दर्शक मान हलविली. नंतर परत थोडावेळ शांती होती – उसासा सोडून) कालच्या गोष्टी पुढे सुरू करायच्या?

**उत्तर :** हो.

**प्रश्न :** मला फार विस्मय वाटतो. कुठल्याही सामाजिक, पारंपारिक, वैचारिक दृष्टीने संकुचित सापळ्याला भेदून लोकविद्या पुढे जात राहते आणि हे कार्य लोकविद्यावंत अतिशय सोज्वळतेने करीत राहतात. अगदी तसेच जसे निसर्ग आपले कार्य करीत राहतो. बरोबर आहे?

**उत्तर :** हो बरोबर आहे.

**प्रश्न :** मला हे आता समजतं आहे की लोकविद्या ही जुनाट परंपरांना कवटाळून न बसता त्यातील उपयुक्त गोष्टींचा स्वीकार करून निरुपयोगी गोष्टींचा त्याग करत राहते. परंतु स्थानांतरित अथवा दुसऱ्या संस्कृतीतून आलेल्या ज्ञानाबाबत लोकविद्येचा आविर्भाव काय असतो?

**उत्तर :** लोकविद्येचा स्वभाव उदार आहे आणि कोणत्याही बाह्य ज्ञानासाठी तिचे दरवाजे नेहमीच उघडे असतात. तर्काच्या कसोटीवर धासून तिला ज्या गोष्टी महत्वाच्या वाटतात, त्याचा ती स्वीकार करते आणि बाकी गोष्टींचा त्याग करते.

**प्रश्न :** विज्ञानाच्या बाबतीत पण तिचा हाच दृष्टीकोन आहे?

**उत्तर :** हो

**प्रश्न :** परंतु तुम्ही या आधी म्हणालात की विज्ञानाने कधी लोकविद्येला शास्त्राचा दर्जा तर दिला नाहीच उलट तिचा तिरस्कारच केला. एवढेच नाही तर विज्ञानाने लोकविद्यावंतांवर आर्थिक आणि बौध्दिक गरीबी लादली आहे. अशा परिस्थितीतही विज्ञानाप्रती लोकविद्येचा व्यवहार मैत्रीपूर्ण राहील?

**उत्तर :** हो, लोकविद्या सगळ्या प्रकारच्या शास्त्रांसोबत बंधुभावाने वागते. कोणत्याही ज्ञानासोबत भेदभाव बाळगीत नाही.

**प्रश्न :** माझा विश्वास बसत नाही. एखादे उदाहरण देऊ शकलात तर बरे होईल.

**उत्तर :** हे तर तुम्हाला दैनंदिन आयुष्यातही पाहता येईल. जेव्हा विद्यापीठातून शिकून सवरून बाहेर पडलेले लोक एखाद्या शेतकऱ्याला किंवा कारागीराला



बाजारात तर 10 टक्के बाहेर जाण्यामध्ये व्यवसायांची प्रतिष्ठा कायम राहते.

**प्रश्न :** परंतु यामध्ये लोकविद्यावंतांच्या ताकदीचा उगम कसा होतो?

**उत्तर :** स्थानिक समाजामध्ये जास्त खपाचा आग्रह धरल्याने भांडवलाच्या केन्द्रीकरणाला लगाम बसतो आणि स्थानिक लोकांच्या पोटापाण्याचा प्रश्न सुटतो. स्थानिक खपामुळे लोकविद्या समृध्द होते आणि लोकांचे जीवनही सुखाचे होते. अशा प्रकारची अर्थ व्यवस्था ज्ञानाधारित आहे कारण यामध्ये प्रत्येक मनुष्य पैशाच्या नाही तर आपल्या ज्ञानाच्या जोरावर भाग घेतो आहे.

**प्रश्न :** परंतु सध्याचा जमाना हा वैश्वीकरणाचा आहे. दूरदूरच्या बाजारामध्ये उत्पादन पाठवण्यामध्ये भरपूर नफा होतो. या परिस्थितीचा कसा सामना करणार?

**उत्तर :** मला तर वाटते की लोकविद्येसाठी ही एक ऐतिहासिक संधी चालून आली आहे जिथे यांत्रिक ज्ञान आणि व्यवस्थांपुढे मानवी ज्ञान आणि व्यवस्थांना पेश करता येईल.

**प्रश्न :** ही ऐतिहासिक संधी कोणती आहे?

**उत्तर :** या ऐतिहासिक संधीला समजून घेणं गरजेचं आहे. औद्योगिक युगात कारखान्यांतील यंत्रांमार्फत भांडवलाचे केन्द्रीकरण झाले. या भांडवलातील मोठा हिस्सा हा लोकविद्यावंतांच्या श्रमाच्या मोबदल्याची चोरी करून उभा झाला आहे. माहिती युगामध्ये या पैशाने वित्तीय भांडवलाचे रुप धारण केले. म्हणजेच भांडवलाचे केंद्रीकरण चरम अवस्थेला पोचले. आता भांडवल आणखी वाढविण्यासाठी केवळ उत्पादन वाढवत नेणे चालण्यासारखं नव्हते. त्यासाठी म्हणून विनिमय क्षेत्र म्हणजेच बाजारांच्या मार्फत भांडवल वाढवण्याचा मार्ग शोधला गेला. परंतु याचा परिणाम असा झाला की कारखाने बंद पडू लागले आणि जगभरातील बाजारांवर पकड बसवण्याचा कार्यक्रम वेग घेऊ लागला. उत्पादन कोणत्याही

**उत्तर :** आज मुलांना डॉक्टर, इंजिनियर, बिझिनेसमेन एवढ्याचसाठी बनवले जाते कारण त्यात पैसा भरपूर मिळतो. प्रत्येक उद्योगात आणि सेवेमध्ये नफा वाढविण्याच्या प्रक्रियेची तरतूद केली की तिला विकसनशील उद्योग असे संबोधिले जाते. हेच कारण आहे की शाळा आणि इस्पितळे यांना आज उद्योगाची श्रेणी प्राप्त झाली आहे. तेथे जाण्यानी माणसाचा खिसा रिकामा होतो तर शरीर रोगी! या आता मानवी संस्था राहिल्या नाहीत तर नफा कमावण्याची यंत्रे झाल्या आहेत.

**प्रश्न :** लोकविद्येमध्ये ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्था आहे, याचा अर्थ काय?

**उत्तर :** लोकविद्येमध्ये उत्पादन आणि वितरण या दोन्ही व्यवस्था ज्ञानावर आधारित असायला हव्या असतात. उत्पादन आणि सेवा या क्रियांमध्ये मनुष्य आणि निसर्गातील संबंधांना भक्कम बनवण्याचा आग्रह आहे.

**प्रश्न :** हे कसे काय पाहू शकतो?

**उत्तर :** लोकविद्येमध्ये निरूपयोगी अशी कोणतीही संकल्पना नाही. उत्पादन आणि सेवेनंतर असे काहीही उरत नाही जे मनुष्य किंवा निसर्गाव्दारे पुनश्च उपयोगात आणले जाऊ शकत नाही. हा एक अतिशय महत्वाचा गुण आहे. कारण यांत्रिक उत्पादनात मोठ्या प्रमाणावर निरूपयोगी गाळ निघणे हे अंतर्भूत आहे. औद्योगिक युगात अशा प्रकारे मोठ्या प्रमाणावर गाळ निर्माण झाला. हा गाळ लोभी लोकांनी आणि समाजाने आपल्या नजरे समोरून दूर केला. लोकविद्येमध्ये निसर्गाकडून जे घेतले त्याहून थोडे अधिकच वापस करण्याची जी वृत्ती आहे, तीच तिची मोठी ताकद आहे.

**प्रश्न :** लोकविद्येला विद्या मानायला मी तयार आहे. वितरण व्यवस्थेबाबत लोकविद्येची मूल्ये काय आहेत?

**उत्तर :** लोकविद्येमध्ये उत्पादन आणि वितरण यामध्ये पुष्कळ अंतर असणे अमान्य आहे. म्हणजे उत्पादन दूरवर नेले जात नाही असे नाही तर स्थानिक खपाला जास्त महत्व आहे. उत्पादनाच्या 90 टक्के हिस्सा स्थानिक



उत्पादन कसे वाढवावे याविषयी चार गोष्टी शिकवतात तेव्हा हे शेतकरी/कारागीर कधी त्यांचा अपमान करीत नाही. त्यांनी सांगितलेल्या गोष्टी आदराने ऐकतो. त्यातून त्याला उपयुक्त वाटल्या त्या गोष्टी आत्मसात करतो परंतु अनुपयोगी गोष्टींबाबत काही बोचरं किंवा अपमान कारक बोलत नाही. परंतु हे सुशिक्षित मात्र लोकविद्यावंतांना अंधविश्वासी, अज्ञानी आणि मागासलेले म्हणतात. त्यांची खिल्ली उडवतात. प्रसंगी अपमानही करतात.

**प्रश्न :** हो, हे तर मलाही जाणवलं आहे. परंतु हे सांगा, की सर्वथा भिन्न संस्कृतींमधून किंवा समाजामधून लोकविद्या ज्ञान कसे घेते?

**उत्तर :** पारंपारिक आणि आधुनिक दोन्ही प्रकारच्या शास्त्रांमधून लोकविद्या ज्ञान धेते आणि त्याचे लोकविद्याकरण करते. ही एक प्रकट प्रक्रिया आहे आणि ती काही बोटावर मोजण्याएवढेच लोक करतात असे नाही तर ती एक सामाजिक प्रक्रिया आहे. यामध्ये असंख्य लोकं कोणत्याही मोबदल्याच्या अपेक्षेशिवाय आणि प्रचाराशिवाय कार्य करीत राहतात. समाजाधारित ज्ञानाचा हा विशेष गुण आहे.

**प्रश्न :** लोकविद्याकरणाचा अर्थ काय?

**उत्तर :** लोकविद्याकरण म्हणजे लोकविद्येला आत्मसात करणे. ज्याप्रमाणे वेगवेगळे प्रवाह गंगेमध्ये विलीन होता आणि गंगाच बनून जातात, त्याप्रमाणे लोकविद्येमध्ये समाविष्ट झालेली विद्या लोकविद्या बनून जाते. असं म्हणूया की भिन्न–भिन्न ज्ञान प्रवाहांना लोकविद्येच्या तत्व–तर्क आदी कसोट्यांवर सामावून घेणे हे लोकविद्याकरण आहे. ज्ञानाचे नवीनीकरण किंवा लोकविद्याकरण हे समाजातीलच असंख्य लोकांव्दारे केले जात असल्याने या ज्ञानावर नियंत्रण सुध्दा समाजातील याच असंख्य सामान्य लोकांचं राहतं आणि ही विद्या लोकांची बनून जाते. हीच लोकसम्मत विद्या आहे. समाजातील किंवा समाजा बाहेरील ज्ञानाला लोकविद्येत सामावून घेण्याची ही जी प्रक्रिया आहे तिची तुलना मनुष्याच्या शरीरातील पाचनक्रियेशी केली जाऊ शकते. नुसतं तोंडात चावून खालेला

पदार्थ शरीराला पोषक होऊ शकत नाही तर त्यासाठी त्या खालेल्या घासाचे पचन क्रियेतील इतर अवयव आणि अनेक रस यासोबत संयोग झाल्यानंतरच त्यातून शरीराला आवश्यक ते पौष्टिक घटक आणि उर्जा उत्पन्न होते. तव्दतच समाजामध्ये निर्माण होणारी उर्जा ही लोकांनी आपल्या नियंत्रणाखाली ज्ञानाचे नूतनीकरण आणि निर्माण करण्यातून तयार होते. यालाच लोकविद्याकरण म्हणतात.

**प्रश्न :** परंतु लोकविद्येमध्ये विज्ञानाचा समावेश होणे जरा कठीणच वाटते आणि विज्ञानामुळे आज आम्हाला इतकं काही मिळालं आहे की ते सोडवतही नाही.

**उत्तर :** हो, कठीण तर आहे. परंतु लोकविद्येत काही कमी आहे म्हणून ते कठीण आहे, असे नव्हे तर समाजामध्ये लोकविद्येबद्दल जो अविश्वास आहे, त्यामुळे आहे आणि तुमचा प्रश्न की विज्ञानामुळे आतापर्यंत मिळालेल्या गोष्टी सोडायच्या कशा, हाच मुळी चुकीचा आहे. प्रश्न तर असा असायला हवा की विज्ञानामुळे ज्या काही अनौरस (जसे की गरीबी) गोष्टी आम्हांला मिळाल्या आहेत, त्यांपासून मुक्ती कशी मिळेल? आणि जे काही विज्ञानाने दिले आहे, त्याचे लोकविद्याकरण कसे होईल?

**प्रश्न :** हो, हे बरोबर आहे. पण अशी मुक्ती मिळायचा रस्ता लोकविद्येत आहे, यावर विश्वास कसा बसावा? मी माझा जुनाच प्रश्न पुन्हा विचारतो की लोकविद्येमध्ये तुम्हांला ही शक्ती कशी आणि कुठे दिसते? या प्रश्नाचं उत्तर जाणून घेतल्याशिवाय मला नाही वाटत की मला हे सगळं समजेल.

**उत्तर :** हो, आता मला वाटतं की आपण पुन्हा मूळ गोष्टीकडे वळलो आहोत. तुमचाच प्रश्न आपण जर दुसऱ्या पध्दतीने केला तर तो असा होईल की लोकविद्येमध्ये राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक शक्ती कोणत्या स्वरूपात आहे आणि सार्वजनिक जीवनात लोकविद्येने लोकशक्ती बनण्याचा मार्ग कसा खुलेल?



मनुष्य जमात या धरणीवर टिकून आहे. भांडवलशाही युगाने मात्र या विचारांना उधथून लावले आहे. आम्हाला आपल्या सामाजिक प्रवृत्तीपासून दूर करण्याचा प्रयत्न या व्यवस्थेत होत आहे. आणि आमच्या गरीबीचे गुपितही यातच लपले आहे.

**प्रश्न :** लोकविद्येमध्ये अर्थव्यवस्थेचा आधार काय आहे?

**उत्तर :** लोकविद्येमध्ये ज्ञान हा अर्थव्यवस्थेचा आधार आहे परंतु आजच्या अर्थव्यवस्थेचा आधार पैसा आहे, हा एक मोठा फरक आहे. औद्योगिक युगात, विज्ञानाच्या सहाय्याने मोठमोठ्या यंत्राची निर्मिती झाली, या यंत्रानी मोठ्या वेगाने प्रचंड उत्पादन करून भांडवलाचे केन्द्रीकरण केले. या पैशाच्या केन्द्रीकरणाने ज्ञानाला आणि राजसभेलाही आपला सेवक बनवले. यामुळे समाजाचे संतुलनच बिघडून गेले. वेळोवेळी होत असलेली युध्दे–महायुध्दे आणि राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय राजनीति हेच दर्शविते.

**प्रश्न :** कसे काय?

**उत्तर :** भांडवलाचे केन्द्रीकरण झाल्याशिवाय भरमसाट नफा होऊ शकत नाही. हा नफा कमावण्याच्या मार्गात असलेले सारे भौतिक, धार्मिक, नैतिक, आणि कायदेशीर अडथळे दूर केले गेले. तत्कालिक सभा, व्यक्तिगत लोभ आणि मोह, संकुचित स्वार्थ आणि हितांच्या पोषणाला पाठिंबा मिळाला, वैज्ञानिक जगाने अशा अर्थव्यवस्थेला जन्मास घातले, जेथे मनुष्याच्या सामाजिक स्वभावाला नष्ट करण्यास सुरूवात केली. औद्योगिक युगाचा इतिहास हा खरे तर युरोपियन मनुष्याच्या लोभी प्रवृत्तीचा इतिहास आहे. जगात आणखी कोणत्याही स्थानाचा किंवा इतर अनेक समाजांचा इतिहास नक्कीच असा नाही. परंतु हे शिकवले जात नाही. याचाच अर्थ असा की आमच्या शिक्षणमध्ये आजही लोभ, मोह याच गुणांना आदर्श मूल्यांच्या स्वरूपात मुलांना शिकवले जाते.

**प्रश्न :** हो, आम्हाला शिकवले गेले होते की मोठे झाल्यावर खूप पैसा कमावण्याची महत्वाकांक्षा बाळगायची.

वाढतानाच दिसत आहे.

**प्रश्न :** लोकविद्येमध्ये काही वेगळ्या प्रकारच्या आर्थिक व्यवस्थांचा विचार आहे का?

**उत्तर :** लोकविद्येमध्ये एका वेगळ्याच प्रकारच्या आर्थिक व्यवस्थेचा विचार विहित आहे. त्या विचाराला प्रतिष्ठा मिळण्यानी आणि त्याचा विकास होण्याने गरीबी दूर केली जाऊ शकते.

**प्रश्न :** असा कोणता विचार लोकविद्येमध्ये आहे?

**उत्तर :** लोकविद्येमध्ये माणुसकीचा विचार आणि व्यवस्था यांचा आग्रह आहे. म्हणजे असे की जेवढे घ्यायचे त्यापेक्षा काकणभर अधिकच परत करण्याचा प्रयत्न करायचा असा लोकविद्येतील आर्थिक विचाराचा आधार आहे. असं म्हणू की यामध्ये माणसांमाणसांतील तसेच निसर्गासोबतचे संबंध दृढ करण्याचा आधार आहे. एकमेकाला समृध्द करण्याचा, एकमेकांची शक्ती वाढवण्याचा आधार आहे.

**प्रश्न :** परंतू, हे समजण्यासाठी थोडे आणखी विस्ताराने सांगा, तर समजेल.

**उत्तर :** शेतकरी आपल्या शेतीला सुपीक ठेवण्यासाठी, तिचा विकास करण्यासाठी नेहमी काही ना काही उपाय योजीत असतो, जसे की पीक तयार करणे, जीव–जन्तू आणि जनावरांचे पालण करणे आणि यांसम आणखी पुष्कळ उपायांनी तो जमिनीची काळजी घेतो. त्याचप्रमाणे समाजातील भिन्न भिन्न उद्योग करणाऱ्या कारागीरांमधील परस्पर संबंधामध्ये हाच विचार प्रभावी असतो. आदिवासीही त्यांना जंगलापासून जे उत्पन्न मिळतं त्यापेक्षा अधिक परत करण्याचा प्रयत्न करतात. नावाडीसुध्दा नदीपासून मिळतं, त्यापेक्षा जास्त नदीला परत करतो. परिचारक, संत, कलाकार इ. च्या सेवासुध्दा याच विचारांनी प्रेरित होत असतात. अशा प्रकारच्या विचारांमध्ये व्यक्तिगत व तत्कालिक स्वार्थ किंवा लोभ यांना तिरस्काराचे स्थान प्राप्त होते. लोकधर्मातील पाप–पुण्याच्या बऱ्याचशा धारणा याच विचारांनी प्रभावित आहेत. या विचारांच्या अमलाखालीच शतकानुशतके



**प्रश्न :** हेच प्रश्न तर मला भंडावत आहेत.

**उत्तर :** या प्रश्नाचे उत्तर देत असताना मी तुमचा पहिला प्रश्न की लोकविद्येचे शोषण का होत आहे आणि यापासून मुक्ती कशी मिळेल, याचे ही उत्तर देण्याचा प्रयत्न करेन. आमचं उद्दिष्टही हेच आहे.

**प्रश्न :** पुन्हा केव्हा भेटायचे?

**उत्तर :** तुम्ही सांगा.

**प्रश्न :** माझ्या गावातील काही लोकांना या प्रश्नोत्तरांत भाग घेण्याची इच्छा आहे. तर तुम्ही आमच्या गावात येऊ शकलात तर मला आनंद होईल.

**उत्तर :** मला ही होईल. तर मग या रविवारी संध्याकाळी जमायचे?

**प्रश्न :** हो, ठीक आहे.

●●●

# ५ लोकविद्येतील सामाजिक शक्ती

आलेसूर गावात कडुनिंबाच्या झाडाला एक छानसा पार बांधलेला आहे. निंबाच्या गार सावलीत दुपारी गावकरी अनेकदा तिथे आरामाला येतात. आता तिथे सात आठ तरूणांचा एक घोळका बसलेला दिसतो आहे. आपला प्रश्नकर्ता आणि त्याचे मित्रच आहेत ते! त्यातील दोघे अजून विद्यार्थी आहेत, एक नागपूरला शिकतो आहे तर दुसरा वर्ध्याला. सध्या ते सुट्टीत घरी आले आहेत. उरलेल्यांपैकी एकाचे जवळच वाळू गिट्टीचे दुकान आहे, एक विणकर आहे तर दोघांचे भाजीचे मळे आहेत. सकाळपासून हे सारे मित्र मिळून एका पाहुण्याबरोबर गावात फेरफटका मारीत आहेत. आता भोजनोत्तर विश्रांतीसाठी ते सारे या पाराच्या आश्रयाला आले आहेत. पाहुणे आपले प्रौढ उत्तरदाताच आहेत. गावकऱ्याची शेती, परंपरागत व्यवसाय याबद्दल त्यांची बरीच चर्चा झाली. गावातील तरूणांचे शिक्षण व रोजगाराच्या संधी याबद्दलही बरेच बोलणे झाले.

यानंतर आपल्या तरूण प्रश्नकर्त्याने पुढाकार घेऊन चर्चा पुढे सुरू केली.

**प्रश्न :** आज आपण लोकविद्येच्या सामर्थ्याविषयी जाणून घेऊया. या सामर्थ्याची ओळख अथवा जाणीव आपल्याला कशी काय करून घेता येईल?

**उत्तर :** लोकविद्येचा जो आधार आहे त्याच्याशी निगडित असे शक्तीरूपच आपल्याला पहायचे आहे. म्हणजेच लोकविद्येच्या सामाजिक शक्तीचाच विचार आपण करायला हवा. कारण त्यातच अन्यायाला आव्हान देण्याचे आणि समाजात न्यायाची प्रतिष्ठापना करण्याचे सामर्थ्य आहे. आपल्याला समाजाच्या राजनैतिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा सगळ्याच क्षेत्रांमध्ये लोकविद्येचे सामर्थ्य ओळखण्याचे आणि तिचा प्रसार करण्याचे महत्वाचे काम करायचे आहे. आपण यापैकी एकेका क्षेत्राचा विचार सुरू करू.

**प्रश्न :** ठीक आहे मग आपण राजकारणापासून सुरूवात करायची का?

**उत्तर :** त्यापेक्षा आपण समाजकारणापासून सुरूवात करू. खरं तर कुठूनही



संपूर्णपणे वेगळा असू शकत नाही. म्हणजे असे जास्त उत्पादन करण्यासाठी लागणाऱ्या क्षमतेचे नियमन करण्याच्या पध्दती, प्रकार, विचार या गोष्टी देखील त्याच्या जीवनाचाच भाग आहेत. असं समजून चालणं की समाजाच्या आर्थिक व्यवस्था तर अर्थ विशेषज्ञच जाणतात आणि साऱ्या जगाचे आर्थिक विघ्न त्यांच्याच बौध्दिक क्षमतेवर टिकून आहे, चुकीचे आहे.

**प्रश्न :** आजकाल टीवी आणि वर्तमान पत्रातून आर्थिक जगाबद्दल ज्या काही बातम्या असतात, त्या खरंतर कोणाला समजतात? चॅनल लागल्याबरोबर बरेचसे लोक बंदच करून देतात. परंतु असे असले, तरी त्या बातम्या आमचे आयुष्य प्रभावित तर करीतच असतील.

**उत्तर :** हो, प्रभावित तर करतातच आहेत. परंतू अशा प्रकारच्या बातम्या म्हणजे संपूर्ण आर्थिक जगातील घडामोडी सांगतात असे म्हणणे चुकीचे ठरेल. कारण या बातम्यांमध्ये कधी लोकविद्यावंतांचे उद्योग बंद पडल्याच्या किंवा त्यांच्या उद्योगांला काही पर्याय सुचविण्याबाबत चर्चा झालेली आम्ही तर कधी ऐकली किंवा पाहिली नाही. तर मग हे आर्थिक विश्व असं कसं की ज्यामध्ये 80 टक्के लोकांच्या आर्थिक हितांबाबत कधी काही बातमीच नसते?

**प्रश्न :** हो, ही गोष्ट तर मलाही जाणवली आहे. या बातम्या ऐकताना कोण्या दुसऱ्याच जगातील गोष्टी ऐकल्यासारखे वाटते.

**उत्तर :** विचार करण्यासारखी गोष्ट आहे की जे 80 टक्के लोक निरनिराळ्या वस्तूंच्या उत्पादनाचे कार्य करतात, तीच त्याची कार्य आणि उत्पादन त्यांच्याच गरीबीला कशी काय कारणीभूत ठरू शकतात? म्हणूनच मी म्हणतो की गरीबी कृत्रिम रीतीने थोपली गेली आहे, परंतु या गोष्टीबाबत आपण या आधीच बोललो आहे. औद्योगिक युगामध्ये वस्तू उत्पादनाच्या व्यवस्था, मोठमोठे बाजार आणि जगण्याच्या पध्दती यामुळे पर्यावरणाची ही खूप हानी तर झाली आहेच, शिवाय समाजामध्येही मोठ्या प्रमाणावर गरीबीची उगम झाला आहे. माहितीच्या सध्याच्या युगात तर ही गरीबी

# ६ लोकविद्येची आर्थिक ताकद

वैनगंगेच्या घाटावरून उन हळूहळू माघार घेऊ लागले होते. चहा पाणी, शीत पेये यांची दुकाने ग्राहकांसाठी सज्ज होत होती. मागील कित्येक वर्षांपासून प्रशासन या दुकानांना हटविण्याचा प्रयत्न करीत आहे. संध्याकाळी काही घाटांवर मेळ्यांसारखी धांदल असते. तर काही घाटांवर स्मशान शांतता! अशाच एका शांतशा घाटावर 6–7 लोक जमा झाले आहेत. थोड्या वेळापूर्वीच आमच्या प्रश्नकर्त्यासोबत दोन–तीन युवकही बैठकीत सामील झाले आहेत. त्यांच्यानंतरही आणखी दोन–तीन जण आले आहेत. त्यांत  काही नावाडी तर काही मच्छीमार समाजाचे आहेत. हे सारे काही शिळोप्याच्या गप्पा करण्यासाठी जमलेले नाहीत तर बदलत्या परिस्थितीबाबत काही विचार विनिमय करण्यासाठी त्यांनी हा योग जमवून आणला आहे. पुष्कळ वेळ गोष्टी चालल्या. दोन्ही समाजातील लोकांनी आपापल्या समाजातील अंतर्गत कलह, राजकीय पक्षांच्या तात्कालिक अवसरवादी धडपडी, प्रशासनाने लागू केलेल्या नवीन नियमांचा परिणाम आदि साऱ्या बाबींवर चर्चा केली. जेवणाला अवकाश असल्याने लोकविद्येच्या शक्तीबाबत बोलायला सुरूवात झाली. लोकविद्येच्या आर्थिक तत्वांचा विचार केल्याशिवाय नावाडी, मच्छीमार, शेतकरी, समाज काय किंवा कोणत्याही समाजाच्या सन्मानाची आणि बरोबरीची गोष्ट सार्वजनिक मंचावर उभी राहणे कठीण आहे.

**प्रश्न :** आज लोकविद्येच्या आर्थिक शक्तीबाबत ओळख करून घ्यायचीच आहे तर याच मुद्यापासून आपण सुरू करूया का?

**उत्तर :** तुम्हास असं काही वाटतं का की माणसाकडे ज्या काही क्षमता आहेत, त्या वापरून तो स्वतःच्या गरजेपेक्षा जास्त उत्पादन करू शकतो. निसर्गामध्ये आपण हे पाहू शकतो की प्रत्येक सजीव जे काही घेतो आहे तेवढे किंवा कणभर जास्तच निसर्गाला परत करतो आहे; जिवंत असताना किंवा मरून सुध्दा! माणसांमध्ये असलेल्या समाज प्रवृत्तीचा अर्थ यातच तर लपलेला आहे की नाही? सामाजिकतेचा आधार हा स्वतःच्या क्षमतेपेक्षा



सुरूवात करता येईल. पण लोकविद्या हे समाजाचे ज्ञान आहे म्हणून सामाजिक क्षेत्रापासून सुरु करणं योग्य ठरेल. गेल्या वीस वर्षात आपल्या समाजात खूपच बदल झालेले आहेत आणि अजूनही होतच आहेत कारण समाज हा परीवर्तनशील आहे आणि सतत बदलणाऱ्या या समाजाचाच ठाव आपल्याला घ्यायचा आहे. समाजातील भेदभाव, उच्चनीचतेच्या कल्पनांपासून मुक्ती आणि समानतेची मूल्ये  आपण जाणून घ्यायला हवीत. हे सर्व जर आपल्याला नीटपणे कळलं तर प्रत्येकाला सामाजिक कार्य आणि जबाबदाऱ्या आपोआपच ऊमजतील.

**प्रश्न :** खरं आहे.

**उत्तर :** गेल्या वीस वर्षात समाजातील ज्ञानाचे स्वरुप खूपच बदलले आहे आणि त्यामुळे समाजाकडे बघण्याचा एक नवाच दृष्टिकोन तयार झालेला आहे. आजवर आपण सामाजिक विषमता दिसली की भांडवलवाद, जात, धर्म, पंथ, प्रदेश या संदर्भातच त्यावर विचार करुन उतारा शोधण्याचा प्रयत्न करत आलो. खरं ना?

**प्रश्न :** हो, असं दिसतं खरं आणि याच सगळ्या आधारावर आपले राजकारण ही उभे आहे. त्यामुळेच आज साम्यवादी, प्रांतवादी पक्ष सत्तेत दिसून येतात, त्याचबरोबर अनुसूचित जाती जमातीचे नेतृत्व करणाऱ्यांनाही संधी मिळालेली दिसते.

**उत्तर :** सर्वांना सत्तेत संधी मिळते ही अर्थातच समाजाच्या दृष्टीने चांगलीच गोष्ट आहे. मात्र चिंतेची बाब अशी की या सामाजिक संदर्भांतून उद्भवलेल्या जाणीवांच्या सीमा आता स्पष्टपणे जाणवू लागल्या आहेत. या जाणीवा समाजातील काही घटकांपर्यंतच संकुचित झाल्या आणि सार्वत्रिक सामाजिक चेतनेच्या रूपाने विस्तार पावू न शकल्या तर समाज परिवर्तनाची प्रेरणा त्यांतून कशी मिळणार? या प्रेरणे अभावी राजसत्ता भांडवलशाही व्यवस्थेची गुलाम बनून राहिली आहे. आजूबाजूला बघा, हेच चित्र नाही का दिसत?

**प्रश्न :** हो, तसं दिसतंय खरं

**उत्तर :** म्हणजेच समाजात जागृत असणारी शक्ती पुन्हा योग्य मार्गाकडे म्हणजे समाजकारणाकडे वळण्याची गरज निर्माण झालेली आहे. आज आपल्या

समाजात परस्पराचा मान व आदर राखण्याचा विचार नव्याने रुजवण्याची गरज आहे. थोडक्यात सांगायचे तर सामाजिक विचारांची पुनर्बांधणी करण्याची, नवे विचार रूजवण्याची आणि त्यासाठी नवीन विचारांची निर्मिती करण्याची वेळ आलेली आहे.

**प्रश्न :** तुमचं म्हणणं खरं आहे. सामाजिक विचारांत निश्चितच काहीसा शिळेपणा जाणवतो. पण म्हणजे सगळेच जुने संदर्भ निरर्थक व टाकाऊ झाले का? आपल्या समाजात अजूनही एवढ्या मोठया प्रमाणवर विषमता ही आहेच की.

**उत्तर :** निश्चितच, जाती, धर्म व भांडवलावर आधारलेली भयानक असमानता दुर्लक्षून विचार व्हावा असे मी म्हणत नाही. विषमता दूर तर व्हायलाच हवी. पण त्याबरोबर आधुनिक काळातील काही घडामोडींमुळे या विषमतेचे स्वरुप बदललेले दिसते आणि विषम सामाजिक संबंधांना नवीन आयाम जोडले गेलेले दिसतात. या घडामोडी वेगवान आहेत, चिवटही आहेत. जुने विचार त्यांचेशी लढा देऊ शकणार नाहीत. अशा परीस्थितीत आपण नव्या समाज विचाराची बांधणी काळजीपूर्वक करायला हवी आणि ही बांधणी इतकी समतोल आणि भक्कम असली पाहिजे की जुन्यातील हीण तर निघालेच पाहिजे आणि नव्या घडणीतील विषमताही दूर झाली पाहिजे.

**प्रश्न :** तुम्ही म्हणता त्या घडामोडी कोणत्या आहेत?

**उत्तर :** गेल्या काही वर्षांमध्ये संगणक व इंटरनेट तसेच मोबाईल फोन यामुळे समाजात एक नवे युग अवतरले आहे. आपण त्याला सूचना युग म्हणू शकतो. मागचे म्हणजे 20 वे शतक औद्योगिक युग होते. आताचे म्हणजे 21 वे शतक सूचना युग आहे. ज्या समाजात संगणक, इंटरनेट किंवा मोबाईल फोनचा वापर जास्त तोच समाज अधिक विकसित, प्रगत आणि ज्ञानपूर्ण समाज असा सर्वत्र प्रचार आहे.

**प्रश्न :** खरं आहे, दूरदर्शन आणि वृत्तपत्रे यातून ही माहिती आम्हालाही मिळालेली आहे. पण या घडामोडी महत्वाच्या का वाटाव्या?



शक्ती आहे हे आपण जाणून घेणं महत्वाचं आहे.

**प्रश्न :** तुमचं म्हणणं मला पटतं आहे. पण बाकी कोणीच याबद्दल बोलताना कधी दिसत नाही याचं आश्चर्य वाटतं.

**उत्तर :** कारण लोकविद्येच्या ज्या शक्तीबद्दल आपण बोलतो आहोत ती सध्या सुप्तावस्थेत आहे. परकीय आक्रमणच्या झंझावातामध्ये लोकविद्येकडे तुच्छतेने पाहिले गेले किंवा तिला दडपण्याचा प्रयत्न केला गेला. त्यामुळे आपली लोकविद्या कुटुंबाच्या अथवा गाव, जातीच्या परिघांत जणू काही दडून बसली किंवा जंगलातील आदिवासींची विद्या त्यांच्यापुरतीच राहू लागली. आम्हाला वाटतं की लोकविद्या शेवटी दुबळी आहे, ती ही बंधने कशी काय तोडू शकणार ? पण हा आपला भ्रम आहे. ही सगळी बंधने तोडून लोकविद्या जेव्हा स्वतःचे खरे रुप प्रगट करेल, तेव्हाच तिच्या विराट शक्तीचा आम्हाला बोध होईल.

**प्रश्न :** थोडक्यात लोकविद्यावंतांची परीस्थिती सध्या कस्तुरीमृगासारखी आहे. स्वतःजवळच्या सुगंधाची कल्पना नसल्याने तो त्याचे मूळ शोधत बावरून हिंडत राहतो त्याचप्रमाणे स्वतःजवळ एवढे मोठे ज्ञानभांडार असूनही ते मात्र त्याबद्दल अजाणच आहेत.

**उत्तर :** खरं आहे, सध्या तरी त्यांची परीस्थिती `तुझे आहे तुजपाशी, परी तू जागा चुकलासी` अशी झाली आहे.

**प्रश्न :** आज तर तुम्ही अतिशय महत्वाची गोष्ट सांगितलीत. यामुळे मला तर एक नवीन विचारधारा सापडली आहे. लोकविद्येला मान्यता देण्याची कल्पना हळुहळु सर्वांना पटेल, असा मला विश्वास वाटतो. पण आपण बोलत राहिलो आणि दिवस मावळून गेला हेही आपल्याला कळलं नाही. चला, थोडी पोटपूजा करुया.

**उत्तर :** चला, मला मात्र या गावात येऊन फार छान वाटलं. येत्या गुरूवारी वैनगंगेच्या घाटावर अवश्य या. तिथे नावाडी आणि मासेमार समाजातील लोकांबरोबर चर्चा करण्याचे ठरविले आहे. तुम्ही आलात तर ही चर्चा पुढेही करुया.

**प्रश्न :** अवश्य ! आम्ही नक्की येऊ.

●●●

आदिवासींचे हक्क नाकारणे हे सारं काही त्याचा पुरावाच आहे. स्वतःच्या ज्ञानाच्या आधारे स्वतःची उपजिविका चालवणं त्यांना अशक्य करणं म्हणजे त्यांचं शोषणच आहे.

**प्रश्न :** लोकविद्येच्या आधाराने मोठमोठ्या कंपन्या आपला व्यापार वाढवताना दिसतात. क्षणभर आपण हे मान्य करू की हे लोकविद्यांवत त्याविरुध्द आवाज उठवतील आणि संघर्ष करून स्वतःला मुक्त करून घेतील. परंतु या घडामोडींमध्ये समाजातील जात धर्म–प्रांत यावर आधारित उच्च–नीच भेदही ते मिटवतील हे कशावरुन ?

**उत्तर :** आपण पाहिलच आहे की लोकविद्या जात–धर्म–क्षेत्र या बंधनात अडकून पडलेली नाही. कारण हे लोकविद्यावंत एखाद्या विशिष्ट धर्माचे–जातीचे किंवा एकाच व्यवसायाशी संबंधित नाहीत. उलट त्यांच्यात तर खूपच वैविध्य दिसून येतं. मात्र हे सूचनायुग त्या सर्वांच्याच ज्ञानाचे शोषण करीत असल्याने `लोकविद्या` हेच त्यांच्यातील एकतेचे सूत्र आहे आणि समाजातील भेदभाव नष्ट करण्याचे सामर्थ्य त्या एकतेच्या सूत्रातच आहे.

**प्रश्न :** लोकविद्येचे सामर्थ्यही खूप आहे आणि त्यात निहित अशा खूप शक्यताही आहेत. तरीपण सामाजिक विचारांचा पाया अधिक व्यापक करायला हवा आहे.

**उत्तर :** हे तर आहेच. मी फक्त एवढेच सांगू इच्छितो की नवविचारांच्या निर्मितीची शक्यता आणि सामर्थ्य लोकविद्येमध्ये का व कसे आहे आणि त्याचबरोबर हेही महत्वाचे आहे की लोकविद्या ही समाजाकडे व त्यातील परस्परावलंबी नात्यांकडे संवेदनशीलतेने पाहते. आतापर्यंत समाजाच्या वेगवेगळ्या गटात संघर्ष होत असत आणि त्या संघर्षातून समाजमनाचा कानोसा घेण्याची युरोपीय पध्दत होती. पण सहृदयपणे या नात्यांकडे पाहिले तर अधिक चांगला पर्याय मिळूही शकेल. कारण लोकविद्येत निसर्गाच्या समृध्दी आणि संवर्धनाच्या छायेत मानवाच्या प्रगतीचा विचार केला जातो. वेगवेगळे मानवी समूह आणि मानव व निसर्ग यांचे संबंध आपुलकीचे व परस्पर संवर्धनाचे असावेत हा विचार लोकविद्येत दिसून येतो. त्यामुळे आताच्या या महत्वाच्या प्रसंगी लोकविद्येत नवीन सामाजिक विचार मांडण्याची



**उत्तर :** कारण या सूचना युगामुळे ज्ञानाच्या क्षेत्रात खूपच मोठी खळबळ उडालेली आहे, आणि या झंझावातात आपण वर बोललो अशा नवीन सामाजिक विचाराला जन्म देण्याची ताकद लोकविद्या बाळगून आहे.

**प्रश्न :** ते कसे ?

**उत्तर :** सूचना युगात नव्या प्रकारचे ज्ञान अथवा माहिती उपलब्ध झाली आहे. त्याला ज्ञान व्यवस्थापन म्हणतात. हे व्यवस्थापन संगणक, इंटरनेट आणि मोबाईल फोनच्या मदतीनेच केले जाते. यावर आधारित अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत. आजच्या युगातील सर्वात महाग असे हे अभ्यासक्रम आहेत आणि या विद्यार्थ्यांना गलेलठ्ठ पगाराच्या नोकऱ्याही मिळतात.

**प्रश्न :** खरच. खूपजण आजकाल हाच अभ्यासक्रम निवडतात, उलट आजकाल विज्ञानशाखेकडे कमीजणांचा ओढा दिसतो.

**उत्तर :** खरे आहे. असे दिसते आहे की आजकाल ज्ञानाच्या क्षेत्रात विज्ञान सर्वश्रेष्ठ मानले जात नाही. आतापर्यंत म्हणजे संपूर्ण 20 व्या शतकात विज्ञान हेच सर्वश्रेष्ठ ज्ञान असल्याचा प्रचार केल्या गेला. आमच्या देशातील लोकविद्येला पायदळी तुडवून, नष्ट करुन विज्ञानाला सर्वश्रेष्ठ दर्जा दिला गेला आणि आता विज्ञानाच्याही वरचढ असे ज्ञान अवतरले आहे. या ज्ञान व्यवस्थापनांमुळे समाजात `श्रेष्ठ–कनिष्ठत्वाच्या` नव्याच पायऱ्या निर्माण होताना दिसताहेत ज्यामुळे एकूण समाजात खूपच खळबळ उडालेली दिसून येते.

**प्रश्न :** पण त्यामुळे लोकविद्येला काय फायदा होईल ?

**उत्तर :** असं आहे की विज्ञानाने लोकविद्येला पूर्णपणे झाकोळून टाकले होते. विज्ञानाने लोकविद्येला ज्ञानाचा दर्जा किंवा प्रतिष्ठा कधीच दिली नाही तर लोकविद्येला दडपून स्वतःचा उदोउदो करुन घेतला. याउलट ज्ञान व्यवस्थपनात लोकविद्येला दडपून टाकण्याचा विचार नाही, तर कोणत्याही माहितीला यात ज्ञानाचा दर्जा दिला जातो. त्यामुळे त्या दृष्टीने ते लोकविद्येलाही ज्ञानच मानतात.

**प्रश्न :** मग ही तर लोकविद्येसाठी स्वागतार्ह घटना आहे.

**उत्तर :** आहे खरी, पण ज्ञान–व्यवस्थापन लोकविद्येकडून याची जबर किंमत मागत आहे.

**प्रश्न :** कोणती किंमत ?

**उत्तर :** आपण त्यावर नंतर सविस्तर चर्चा करु. प्रथम हे समजून घेणे आवश्यक आहे की या नव्या सूचना युगात ज्ञान व्यवस्थापन, विज्ञान आणि लोकविद्या यांत परस्पर काही नवेच नाते निर्माण होते आहे. त्यामुळे सामाजिक संबंध आणि सत्ता यातही बदल घडताना दिसून येतो. त्यामुळे अशा काही शक्यता निर्माण होत आहेत की आपले लोकविद्यावंत ज्ञानाच्या क्षेत्रात आणि समाजात एकजुटीने स्वतःसाठी बरोबरीचे आणि प्रतिष्ठेचे स्थान मिळवू शकतील. एवढेच नाही तर ते संपूर्ण समाजात अधिक न्यायपूर्ण अशी पुनर्बांधणी करण्याची कल्पनाही मांडू शकतील.

**प्रश्न :** तुम्ही तर खूपच आशादायी चित्र रंगविले आहे. आम्हाला याविषयी आम्हाला अधिक विवेचन ऐकायला आवडेल.

**उत्तर :** असं पहा, की, ज्ञानाच्या क्षेत्रामध्ये विज्ञानाची मक्तेदारी संपुष्टात आल्यामुळे पाश्चिमात्य मूल्यांनाच आदर्श मानण्याची विचारसरणी मागे पडलेली दिसते. अमेरीकन आदर्शांविषयी समाजात आकर्षण अवश्य आहे. परंतु समाजातील एक मोठा भाग लोकविद्येचे महत्व आता ओळखू लागला आहे. अर्थातच लोकविद्येला समाजात प्रतिष्ठेचे स्थान मिळविण्यासाठी व त्याचबरोबर लोकविद्यावंताना आपल्या ज्ञानाच्या बळावर समतेचा दावा करण्यासाठी हीच सुयोग्य संधी आहे. आरोग्य, संगीत, साहित्य, कला, हस्तोद्योग, पाककला, घरगुती वस्तुंचे निर्माण अशा सर्वच क्षेत्रात लोकविद्येने आघाडी घेतलेली दिसते. त्यामुळे लोकविद्यावंताना प्रलोभने दाखवून आपल्याकडे वळवून घेण्याचा उद्योग तेजीत आहे. मोठमोठ्या कंपन्यांना त्यात करोडोंच्या व्यापार संधी व लाभ दिसतो आहे. आपल्या व्यक्तिगत फायद्याच्या संकुचित विचारांना महत्व देण्याऐवजी लोकविद्यावंतानी जर संपूर्ण समाजाच्या हिताचा विचार केला तर हा करोडोंचा नफा समाजात फिरता राहिल आणि या लोकविद्यावंताच्या पावलाने समाजात खरोखरच `लक्ष्मीची पावले` उमटतील.



**प्रश्न :** असं होऊ शकतं खरं. लोकविद्येच्या सन्मानासाठी निरनिराळे कार्यक्रम होतातही पण लोकविद्याधर समाजाचा त्यामुळे काही फायदा झालेला दिसत नाही, उलट कार्यक्रमाचे संयोजक मात्र गब्बर झालेले दिसतात.

**उत्तर :** आणि इथे प्रश्न फक्त आर्थिक फायद्याचाही नाही तर याचा जवळचा संबंध आमचा सन्मान आणि प्रतिष्ठा या महत्वाच्या गोष्टींशी आहे. हा तर सरळसरळ आमच्या क्षमतेचा दुरुपयोग आहे आणि दिवसाढवळ्या आमचे ज्ञान व श्रम यांची ही लूट चाललेली दिसते. विज्ञानयुगात कारखाने उभारले गेले आणि आमच्या लोकविद्येला उन्मत्तपणे गाडून टाकले गेले. आताच्या ज्ञान व्यवस्थापनशास्त्राने लोकविद्येला आपल्या ताब्यात ठेवण्याचे धोरण अवलंबिले आहे. लोकविद्येच्या आधारे मोठमोठ्या कंपन्या व्यापार करतात व करोडो रुपयांचा नफा कमवितात. दुसरीकडे लोकसंगीत, लोकनृत्य, लोकभाषा आणि लोकगीताच्या वाटेने पैसा कमवण्याची क्लृप्ती वापरली जाते. पारंपारिक खाद्यपदार्थ, कपड्यांची डिझाईन्स व शिवणकला याचाही उपयोग व्यापारासाठीच केला जातो. थोडक्यात माहिती युगात लोकविद्येचे शोषण होताना दिसते.

**प्रश्न :** मग तर या युगात लोकविद्यावंतांचे फक्त श्रमच नव्हे तर ज्ञानही व्यापारी फायद्यासाठीच वापरले जाईल ना?

**उत्तर :** खरं आहे. आजही लोकविद्यावंतांची जी ससेहोलपाट होताना दिसते ती याच कारणामुळे आणि लोकविद्येवर वर्चस्व गाजवण्याच्या हेतूने त्यांची परवड जाणूनबुजून केली जाते असं मानायला वाव आहे.

**प्रश्न :** मग तर या विद्यावंताना स्वतःच याविरुध्द दंड थोपटावे लागतील. आजच्या युगातील ही एक महत्वाची गोष्ट ठरेल.

**उत्तर :** असं वाटतं आहे खरं. शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावणे, छोट्या कारागिरांचे व्यवसाय बंद पडणे, लहान दुकानदारांचा व्यापार हळूहळू नष्ट होणे,